किंमत : १० रुपये

मार्च २०१०

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

संपादकीय
समतोल स्वागतार्ह अर्थसंकल्प

- औरंगाबादचे राज्यस्तरीय शिबीर
- समस्यांच्या भोवऱ्यात मनमोहन सरकार
- महागाई विरोधात लढा
- ११ वी प्रवेश कसा? कोणाला?
- श्रेष्ठ शिल्पकार- श्रीराम सुतार
- आंबासम्राट- काकासाहेब चमणकर






# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ समतोल स्वागतार्ह अर्थसंकल्प | संपादकीय | २ |
| ■ औरंगाबाद येथील राज्यस्तरीय शिबिराचा वृत्तांत :- | | |
| १) लोकांच्या विश्वासातूनच पक्ष मोठा होईल | शरद पवार | ५ |
| २) औरंगाबादच्या राष्ट्रवादी भवनाचे उद्‌घाटन | | १८ |
| ३) जातीयवाद्यांशी कधीही समझोता नाही | मधुकरराव पिचड | २२ |
| ४) राजकारणाचा केंद्रबिंदू पवारसाहेबच... | प्रफुल पटेल | २३ |
| ५) कार्यकर्त्यांना सन्मानाने वागविले पाहिजे | गोविंदराव आदिक | २५ |
| ६) वीज चोरणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा द्यावी | अजित पवार | २६ |
| ७) पिण्याच्या पाण्याचे आवश्यक तेवढेच आरक्षण | अजित पवार | ३० |
| ८) निवडणुका स्वबळावर लढवायच्या | आर. आर. पाटील | ३६ |
| ९) महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाच्या नव्या दिशा | जयंत पाटील | ३९ |
| १०) भविष्यात स्वबळावर उभे राहावेच लागेल | छगन भुजबळ | ४१ |
| ११) रस्त्यावर उतरून संघर्षाची तयारी ठेवा | जितेंद्र आव्हाड | ४३ |
| १२) अल्पसंख्याकांच्या आरक्षणाचे धोरण ठरवा | हबीब फकी | ४३ |
| १३) दलितांना निवडणूक समितीत स्थान हवे | प्रा. लक्ष्मणराव ढोबळे | ४४ |
| १४) युवा धोरणाची पुनर्रचना झाली पाहिजे | सुप्रिया सुळे | ४५ |
| १५) प्रादेशिक वादाने मानसिक दुभंगलेपण | डी. पी. त्रिपाठी | ४६ |
| १६) पवारांवरील टीकेला चोख उत्तर द्या | तारीक अन्वर | ४६ |
| १७) डावे राजकारणातला समतोल बिघडवितात | सुनील तटकरे | ४७ |
| १८) दरवाढीशिवाय शेतकऱ्यांना न्याय कसा मिळणार? | अरुण गुजराथी | ४८ |
| १९) न्या. मिश्रा अहवालाची अंमलबजावणी करा | नबाब मलिक | ४८ |
| ■ आता खरी गरज 'भारतीय मानसिकता'च बदलण्याची | डॉ. रघुनाथ माशेलकर | ५० |
| ■ वाढत्या महागाई विरोधात केंद्र व राज्यांनी संयुक्त लढा देणे गरजेचे | शरद पवार | ५७ |
| ■ समस्यांच्या भोवऱ्यात मनमोहन सरकार | विजय नाईक | ६७ |
| ■ ११ वी प्रवेश कसा? कोणाला? | निरंजन डावखरे | ८० |
| ■ आंबासम्राट काकासाहेब चमणकर | कृष्णा ऊर्फ अविनाश चमणकर | ८२ |
| ■ श्रेष्ठ शिल्पकार- श्रीराम सुतार | डॉ. सुधीर भोंगळे | ८६ |
| ■ भारतीय क्रिकेट संघाच्या विश्वविजेतेपदावर शिक्कामोर्तब | मुकुंद मोघे | ९० |



प्रबंध संपादक
**मधुकरराव पिचड**
वर्ष दुसरे
अंक : **विसावा**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक व प्रबंध संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादक :
**डॉ. सुधीर भोंगळे**

संपादकीय पत्रव्यवहार
राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी : ३०२३५५१८/५५/५६

व्यवस्थापकीय संचालक
**हेमंत टकले**
वितरण व्यवस्था :
**डॉ. गजानन देसाई**
निर्मिती व्यवस्था :
**जितेंद्र गोस्वामी**
मुखपृष्ठ रचना :
**दिलीप रोडे, पुणे**

**वर्गणीचे दर :**
**वार्षिक रु. २००/-**
**आजीव रु. २०००/-**
(दिवाळी अंकासह)

हे मासिक
www.mhncp.org
यावर उपलब्ध आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. मधुकरराव पिचड यांनी मयुर प्रिंटर्स, ५०६/मयुरेश, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई -३३ येथे छापून राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - २१, येथून प्रकाशित केले.

# संपादकीय



# समतोल स्वागतार्ह अर्थसंकल्प

केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी नुकताच सादर केलेला २०१०-११ चा अर्थसंकल्प हा ढोबळ मानाने विचार करता जनसामान्यांच्या हिताचे रक्षण करणारा आणि देशाच्या आर्थिक प्रगतीस चालना देणारा आहे असेच म्हणावे लागेल. प्राप्तीकर दात्यांच्या श्रेणींचे सुसूत्रीकरण-निर्गुंतवणूकीस चालना-आर्थिक मंदीवर मात करण्यासाठी व्यापार व उद्योग क्षेत्रास दिलेल्या सवलती व इकॉनॉमिक पॅकेजस आणखी काही काल तरी चालू राखण्याचा धोरणात्मक निर्णय-महागाई व चलनवाढीस आळा घालण्यासाठी अनावश्यक सरकारी खर्चाप्रमाणे काही अनुदानांनाही (सबसिडीज) कात्री लावून सेवा कराची व्याप्ती व अप्रत्यक्ष करांचे प्रमाण वाढवून सरकारी महसुलात ५० हजार कोटी रुपयांची घातलेली भर आणि तेराव्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या 'टॅक्स शेअरिंग फॉर्म्युला'स मान्यता (ज्यायोगे एकूण कर महसुलात राज्य सरकारांचा असलेला हिस्सा लक्षणीय प्रमाणात वाढणार आहे.) अशा अनेक गोष्टींचा निर्देश या अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये म्हणून करता येईल. अर्थात केंद्रातील युपीए सरकारचे एकूण धोरण आम आदमींच्या हितसंबंधांचे रक्षण व संवर्धन करण्याचेच असल्यामुळे त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात पडणे, तसे अटळच होते.

या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना खुद्द पंतप्रधान आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहनसिंग यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते खूप काही सांगून जाणारे आहेत. ''हा अर्थसंकल्प आर्थिक प्रगतीचा वेग तब्बल नऊ टक्क्यांवर नेईल,'' असा विश्वास व्यक्त करून त्यांनी म्हटले आहे की, ''देशाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आम्ही काम करीत आहोत. अर्थात प्रगतीचा वेग वाढवित असताना एकंदर आर्थिक स्थैर्य टिकविण्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे आणि प्रणवबाबूंच्या या समतोल अर्थसंकल्पाने नेमकी त्याचीच निश्चिती केली आहे.''

भारताची वाढती लोकसंख्या आणि वाढती अन्नधान्याची गरज लक्षात आल्यामुळे गेली पाच-सात वर्षे देशात सातत्याने दुसऱ्या हरितक्रांतीसंबंधी विविध व्यासपीठांवरून बोलले जात होते. १९६५-६६ च्या सुमाराला झालेली पहिली हरितक्रांती पंजाब, हरियाना आणि उत्तर प्रदेशचा काही भाग येथेच यशस्वी झाली होती. इतर राज्ये या हरितक्रांतीपासून लांबच राहिली होती. मात्र त्यांची उत्पादन व उत्पादकता वाढविण्याची क्षमता त्यामुळे तशीच उपेक्षित राहिली होती. नेमकी ही गरज ओळखून अर्थमंत्री मुकर्जी यांनी ओरिसा, छत्तीसगड व अन्य राज्यात ही दुसरी हरितक्रांती तरी यशस्वी व्हावी म्हणून चारशे कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. ही अन्नधान्य उत्पादनवाढ व धान्यातील स्वयंपूर्णता

वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची घटना आहे. या हरितक्रांतीमध्ये उत्तम प्रकारच्या संकरित व जेनेटिकली मॉडीफाईड बी-बियाण्यांचा वापर, खतांचा संतुलित वापर, सिंचनाच्या पुरेशा सुविधा व पीक कर्जाची वेळेवर उपलब्धता याही गोष्टी अभिप्रेत असून त्यांचे प्रावधान अर्थसंकल्प सादर करताना राखले गेले आहे. ओरिसा, छत्तीसगड, बिहार या राज्यांमध्ये तुलनेने पाण्याची मुबलकता आहे. जमिनी सुपीक व उत्तम भरपूर उत्पादन देणाऱ्या आहेत. पण त्यांच्या उत्पादनक्षमतेचा पुरेपूर वापर अद्याप झालेला नाही. तो करून घेण्याच्या दृष्टीने अर्थमंत्र्यांनी पाऊले टाकून पीक कर्जाचे उद्दिष्टही ५० हजार कोटींनी वाढविले आहे.

वाजपेयींचे सरकार केंद्रात सत्तेवर होते तेव्हा देशातला शेती पीक कर्जपुरवठा जेमतेम ८० हजार कोटींच्या आसपास होता. डॉ. मनमोहनसिंग यांनी पंतप्रधानपदाची आणि श्री. शरद पवार यांनी केंद्रीय कृषीमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून टप्प्याटप्प्याने हा कृषी पीक कर्जपुरवठा गेल्या चार-पाच वर्षांत वाढवित वाढवित सव्वा तीन लाख कोटींवर नेला होता आणि आता या अर्थसंकल्पाने तो पावणेचार लाख कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. इतकेच नव्हे तर कोणताही गरजू शेतकरी हा पीक कर्जाशिवाय राहू नये आणि अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज मिळावे या दृष्टीने धोरणांची रचना करण्यात आलेली आहे. त्यामुळे हे सर्व शेतकरी शेतीमाल उत्पादनाच्या मूळ प्रवाहात सामील होऊ शकल्याने उत्पादन व उत्पादकता वाढीस मोठा हातभार लागू शकणार आहे. शेतकऱ्याला नुसते कर्जच या अर्थसंकल्पाने उपलब्ध होणार आहे असे नाही तर वेळेवर पीककर्ज परत करणाऱ्या शेतकऱ्यांना पूर्वी व्याजदरात एक टक्का सवलत दिली जायची. त्यामुळे ७ टक्क्यांचे पीककर्ज त्याला सहा टक्क्यांनी मिळायचे. यात आणखीन एक टक्क्यांची सवलत अर्थमंत्र्यांनी देऊन आता वेळेवर कर्जाची रक्कम भरणाऱ्यांना पाच टक्के दराने पीककर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने मोठी समाधानाची बाब आहे.

एवढ्यावरच अर्थमंत्री थांबले आहेत असे नाही. वाढलेल्या व उत्पादित झालेल्या कच्च्या शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी राहिल्याशिवाय शेतकऱ्याच्या मालाला रास्त दर मिळणार नाही व मूल्यवृद्धीही होणार नाही हे लक्षात घेऊन अन्न प्रक्रिया उद्योगाचे पाच समूह पार्क्स नव्याने उभे करण्याचे अर्थमंत्र्यांनी ठरवून त्यासाठीची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. हे प्रक्रिया क्षेत्र पुढे नेण्याच्या दृष्टीने टाकलेले क्रांतीकारी पाऊल आहे. प्रक्रिया क्षेत्राकडे कुणी फारसे लक्ष देत नाही आणि लोकही मोठ्या संख्येने पुढे येऊन प्रक्रिया उद्योगांची उभारणी करीत नाहीत अशी अन्नप्रक्रिया उद्योग मंत्री सुबोधकांत सहाय यांची बऱ्याच दिवसांपासूनची तक्रार होती. ती दूर होण्यास आता थोडी मदत होईल.

गेल्या वर्ष-दीड वर्षांत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानासारखे अनेक कल्याणकारी आणि कृषीउत्पादनवाढीस चालना देणारे उपक्रम सुरु करुन सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्रास पुन्हा महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले आहे, हे ही लक्षात घेतले पाहिजे.

गेल्या २००९-१० च्या अर्थसंकल्पात कृषी व संलग्न क्षेत्रासाठी १०,१२३ कोटी रुपयांची तरतुद होती. यावेळी मात्र तो आकडा २१.६ टक्क्यांनी वाढून १२,१८५ कोटी रुपयांवर नेण्यात आला आहे. या वाढीव अर्थबळाच्या मदतीने कृषीउत्पादनांची नासाडी (वेस्टेज) रोखण्याचा, शेतकऱ्यांना पतपुरवठा करणारी यंत्रणा अधिक सक्षम बनविण्याचा आणि अन्नप्रक्रिया उद्योगांच्या उभारणीस प्राधान्य देण्याचा तसेच वेळेत पिक कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांना पाच टक्के दराने पिक कर्ज देण्याचा कार्यक्रम राबविला जाणार आहे आणि तो देशाच्या कृषीआघाडीच्या अधिक प्रगतीस निश्चितच सहाय्यक ठरेल.

महाराष्ट्रात १९७२ पासून राबविली जात असलेली रोजगार हमी योजना दोन वर्षांपूर्वी केंद्राने स्वीकारून ती देशातील काही जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविली होती. सुरुवातीला पहिल्या वर्षी १६ हजार कोटी रुपयांची तरतूद याकरिता अर्थसंकल्पात केली गेली होती. राजस्थान, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, मध्यप्रदेश व इतर काही राज्यांचा या योजनेला मिळालेला मोठा प्रतिसाद पाहून मागच्या वर्षी या योजनेची तरतूद ४० हजार कोटी रुपये केली होती. यंदा या योजनेचे नाव महात्मा गांधी केंद्रीय रोजगार हमी योजना (नरेगा) असे करण्यात आले असून यावर्षी ४८ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. दुर्दैवाने महाराष्ट्राने मात्र या योजनेचा फायदा फारसा उचलून निधी वापरला नाही. इतर राज्यांनी जलसंधारण व सिंचनाशी संबंधित असणारी अनेक कामे पूर्ण करण्यासाठी या 'नरेगा'चा निधी वापरला. आपण मात्र या योजनेकडे दुर्लक्ष करून अनेक विकास कामे रेंगाळत, अर्धवट ठेवली. अजूनही वेळ गेलेली नाही. महाराष्ट्राने आणि विशेषतः लोकप्रतिनिधी व प्रशासन यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न

करून 'नरेगा'चा निधी महाराष्ट्रात जास्तीत जास्त कसा वापरला जाईल हे डोळ्यांत तेल घालून पाहिले पाहिजे. तरच अर्थसंकल्पात निधी वाढवून दिल्याचा फायदा आपण उचलला असे होईल.

पेट्रोलियम उत्पादनांच्या आयातीवरील अबकारी कर प्रतिलिटरला एक रुपयांनी वाढविण्याची तरतुद करण्याचा निर्णय अर्थमंत्र्यांना कठोरपणे घ्यावा लागला आहे. कारण अनुदानित दरात पेट्रोलियम उत्पादनांची विक्री करावी लागत असल्यामुळे आपल्याकडील तेलकंपन्या आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेल्या आहेत आणि ऑईल बॉण्डसच्या माध्यमातून कर्जे उभारत आपले अस्तित्व कसेबसे टिकवून आहेत. त्यांना जीवदान द्यावयाचे असल्यामुळे हा निर्णय घेणे आवश्यकच होते. परिणामी आता पेट्रोल व डिझेलचा वापर अगदी काटकसरीने व काळजीपूर्वक करण्याची सवय तमाम देशवासियांनी अंगी बाणविणे ही काळाची गरज आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी शालेय शिक्षण व साक्षरता प्रसाराच्या कामासाठी जादा पाच हजार कोटी रुपयांची तरतुद करण्यात आलेली असली तरी आपल्या देशाची प्रचंड व्याप्ती आणि निरक्षरांची अफाट संस्था लक्षात घेता पुढील काळात अधिक तरतूद करावी लागेल. 'एज्युकेशन सेस'च्या नावाखाली प्रारंभिक शिक्षा कोषात' जी रक्कम जमा होते, त्यात यंदा २२०० कोटी रुपयांची भर पडली आहे. या सर्व रकमेचा वापर शिक्षणसंस्थांची संख्या वाढविण्यासाठी व दर्जा उंचावण्यासाठी होणे गरजेचे आहे. तसे झाले तरच साक्षरतेच्या माध्यमातून या देशातील नागरिकांचे सबलीकरण करण्याचे उद्दिष्ट साध्य होईल.

आर्थिक तुटीचे विक्रमी ६.८ टक्क्यांवर गेलेले प्रमाण रोखणे आणि मंदीच्या काळात दिलेल्या इकॉनॉमिक पॅकेजेसचे परिणाम टिकविणे, ही दोन नवी आव्हाने प्रणवबाबूंपुढे यावेळी होती. ती समर्थपणे पेलतांना त्यांनी २०१०-११ मध्ये आर्थिक तुटीचे प्रमाण साडेपाच टक्क्यांवर आणण्याचे आणि त्यापुढील दोन वर्षांत ते अनुक्रमे ४.८ टक्क्यांवर व ४.१ टक्क्यांवर आणण्याचे शुभ संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे यंदा कर्जरुपाने सरकारला साडेचार लाख कोटी रुपयांची रक्कम उभारावी लागेल. अशी अपेक्षा होती. परंतु सरकारी खर्चास कात्री लावून तो आकडा ३ लाख, ४५ हजार कोटी रुपयांवर आणण्यात आला आहे. त्यामुळे व्याजदरवाढीचे संकट तर टळू शकेलच परंतु चलनवाढीसही आळा बसेल.

उत्तम प्रगतीचा आत्मविश्वास आणि विचारांची सुस्पष्टता ही या अर्थसंकल्पाची आणखी दोन वैशिष्ट्ये आहेत. तो मांडतांना 'आगामी चार वर्षांत आपल्या अर्थव्यवस्थेस जगात सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेचे परिमाण प्राप्त होईल' अशी जी ग्वाही प्रणवबाबुंनी दिली ती केवळ स्वागतार्हच नाही तर अनेकदृष्ट्या दिलासादायकही आहे. आज आपल्यापुढे जीवनावश्यक वस्तूंची महागाई आणि चलनवाढीचे संकट असले तरी नजिकच्या भविष्यात आपण त्यावर जरूर मात करू आणि सर्वांगीण प्रगतीचे उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेने मोठी मजल मारू असे स्पष्ट संकेत या अर्थसंकल्पाने दिले आहेत. अर्थात ते प्रत्यक्षात साकारण्यासाठी आपल्या सर्वांनाच अधिक मेहेनतीची कास धरावी लागणार आहे आणि प्रसंगी आवश्यक त्या त्यागासाठीही सिद्ध राहावे लागणार आहे हे निश्चित. सध्या जीवनाच्या विविध क्षेत्रात पुढे येण्यासाठी आपण जी धडपड करीत आहोत त्यास यापुढे आर्थिक शिस्तीची जोडही दिली जाणे फार आवश्यक आहे. सरकारी खर्च व काही गोष्टींच्या अनुदानात कपात करण्याचा निर्णय प्रणवबाबूंनी त्यासाठीच घेतला आहे.

पायाभूत सोयीसुविधांचे प्रकल्प आकारास आणण्यासाठी जादा आर्थिक तरतुद- उर्जाक्षेत्रासाठीच्या तरतुदींत दुप्पट वाढ - रस्त्यांच्या कामांसाठी अधिक पैशाची व्यवस्था आणि एकूणच देशउभारणीच्या कामात खासगी गुंतवणूकदारांना सहभागी करून घेण्याच्या योजना अशा अनेक कारणांमुळे हा अर्थसंकल्प बहुशः सर्वच समाजघटकांच्या प्रशंसेस पात्र ठरला आहे. देशाच्या आर्थिक विकासप्रक्रियेस नवी दिशा, नवी गती आणि नवी शिस्त प्राप्त करून देण्याचे जे संकेत त्यामुळे मिळाले आहेत ते निःसंशय राज्यकर्त्यांप्रमाणे जनसामान्यांचाही विश्वास दृढ करणारे, वाढविणारे आहेत. अर्थात हा सारा आकड्यांचा खेळ कागदावर जरी अशक्य ते शक्य करून दाखविणारा वाटत असला तरी अखेर त्यात नमूद केलेल्या विविध धोरणे व प्रस्तावांची अंमलबजावणी प्रत्यक्ष व्यवहारात नेमकी कशी व किती होणार यावरच त्याचे खरे यश अवलंबून राहाणार आहे, हे मात्र निश्चित. तथापि, सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे' ही समर्थोक्ती लक्षात घेऊन आपण कालमानानुरुप आपल्या आचार-विचारांत योग्य ते बदल करू तर या अर्थसंकल्पाच्या गुणवैशिष्ठ्यांचा लाभ तर आपल्याला मिळेलच याविषयी मनात कोणतीही शंका नाही.






**आपल्या पक्ष स्थापनेला आज जवळपास १० वर्षे होऊन गेली आहेत. एखाद्या राजकीय पक्षाचा मर्यादित काळात एवढा विस्तार झालेला क्वचितच पाहायला मिळतो. काँग्रेसला १२५-१५० वर्षांची परंपरा आहे. भाजपला सुद्धा ५० वर्षे झालेली आहेत. साम्यवादी डावे व उजवे हे सगळे वर्षानुवर्षे या देशात काम करताहेत. या सगळ्यांची व राष्ट्रवादी काँग्रेसची वाढ बघितली तर अत्यंत मर्यादित काळात आपला पक्ष देशभर खूप विस्तारून आश्चर्य वाटावे एवढी पक्षाची प्रगती झालेली आहे. जनतेत एक प्रकारचा नवा आत्मविश्वास पक्षाने निर्माण केला आहे. आणखीन अधिक कष्टाने पुढे जाण्याच्या दृष्टीने पाऊले पडली तर आपल्या राष्ट्रवादी संघटनेचे भवितव्य अत्यंत उज्वल आहे.**

# लोकांच्या विश्वासातूनच पक्ष मोठा होईल

## - शरद पवार

*महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राज्यस्तरीय शिबिर दि. ६ व ७ फेब्रुवारी, २०१० रोजी औरंगाबाद येथे संपन्न झाले. या शिबिराच्या समारोपप्रसंगी श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण.*

काही महत्वाच्या शास्त्रीय, राजकीय व सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात विचार व उहापोह या शिबीरात झाला हे ऐकून आनंद वाटला. जगात व देशात नित्य बदल घडत असतात. त्यांची जाण व जागृती राजकीय कार्यकर्त्यांनी ठेवायची असते. या बदलांचे दर्शन शिबीरातून घडते. प्रांताध्यक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो. फार तातडीने त्यांनी सर्वांना एकत्र केले आणि निवडणुकीनंतरच्या पक्षाच्या पुढच्या वाटचालीचे मंथन घडवून आणले. विविध प्रश्नांसंबंधीची आपली निती, धोरण हे आपल्या सर्वांसमोर मांडले गेले आहे. येथून बाहेर पडताना आपल्याला त्याची उपयुक्तता निश्चित मोठ्या प्रमाणावर झाल्याशिवाय राहणार नाही. अनेकांनी महत्त्वाचे प्रश्न येथे मांडले. त्याला शास्त्रीय आधार काय हे ही या ठिकाणी सांगण्यात आले. चर्चा झालेल्या विषयांसंबंधीची टिपणे माझ्या पाहण्यात आली. अनेक चांगल्या, आधुनिक स्थितीच्या संबंधातील कल्पना येथे मांडल्या गेल्या.

आपल्या पक्ष स्थापनेला आज जवळपास १० वर्षे होऊन गेली आहेत. एखाद्या राजकीय पक्षाचा मर्यादित काळात एवढा विस्तार झालेला क्वचितच पाहायला मिळतो. काँग्रेसला १२५-१५० वर्षांची परंपरा आहे. भाजपला सुद्धा ५० वर्षे झालेली आहेत. साम्यवादी डावे व उजवे हे सगळे वर्षानुवर्षे या देशात काम करताहेत. या सगळ्यांची व राष्ट्रवादी काँग्रेसची वाढ बघितली तर अत्यंत मर्यादित काळात आपला पक्ष देशभर खूप विस्तारून आश्चर्य वाटावे एवढी पक्षाची प्रगती झालेली आहे. जनतेत एक प्रकारचा नवा आत्मविश्वास पक्षाने निर्माण केला आहे. आणखीन अधिक कष्टाने पुढे जाण्याच्या दृष्टीने पाऊले पडली तर आपल्या राष्ट्रवादी संघटनेचे भवितव्य अत्यंत उज्वल आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे अशा सर्व बैठकांमधून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा करण्याचा प्रघात आपल्याकडे आहे.

विविध राजकीय पक्ष देशांत काम करतात पण त्यांच्या बैठकांमधून हवामान, जागतिक तपमान वाढ, हवामानातील बदल, त्यांचा होणारा परिणाम यासंबंधी कधीही चर्चा झालेली नाही. वास्तविक या सर्व गोष्टींचा समाजावर व धोरणांवर काही एक निश्चित असा परिणाम होत असतो. त्यासंबंधीचे वास्तव चित्र सर्वांसमोर मांडण्यात आले पाहिजे. हे काम आपला पक्ष फार प्रभावीपणे करतो आहे. उत्तर हिंदुस्तानात मागील वर्ष हे सर्वात उष्ण वर्ष म्हणून गणले गेले. टाईम्सच्या पहिल्या पानावर सर्वात ठळक वृत्त काही दिवसांपूर्वी यासंबंधीचे होते.

यंदाच्या वर्षी भारतातच नव्हे तर जगातल्या अनेक देशात थंडीची मोठी लाट आल्याचे पाहण्यास मिळाले. लंडन सारख्या शहरात एखादा दिवस असा बर्फ पडलेला बघायला मिळायचा. पण यंदा ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस हिम्रो




*शिबिराच्या समारोपप्रसंगी व्यासपीठावर (डावीकडून) गोविंदराव आदिक, निवेदिता माने, छगन भुजबळ, मधुकर पिचड, शरद पवार, डी. पी. त्रिपाठी, विजयसिंह मोहिते-पाटील, रामराजे नाईक-निंबाळकर.*




*औरंगाबाद जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे शरद पवार यांना तलवार भेट देण्यात आली. तेव्हा व्यासपीठावर (डावीकडून) हेमंत टकले, छगन भुजबळ, मधुकर पिचड, मनमोहन ओबेरॉय, वसंत वाणी, डी. पी. त्रिपाठी आणि तारिक अन्वर.*

विमानतळ बंद होता याचे कारण बर्फ. अनेक शहरात व युरोप खंडात बर्फ वृष्टीमुळे दळणवळणावर विपरीत परिणाम झाल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे. यंदाच्या वर्षी थंडीच्या कडाक्याने मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या देशांत लक्षणीय आहे. थंडी चांगली कडक पडली व जास्त दिवस राहिली तर गव्हाचे पीक चांगले येते असे शास्त्रज्ञ सांगतात. यंदा थंडी चांगली होती. कालच (६ फेब्रुवारी, २०१०) देशाच्या पंतप्रधानांकडे जी बैठक झाली त्यात पंजाब, हरियाना, छत्तीसगड, बिहार, गुजरात या सर्व मुख्यमंत्र्यांनी ही गोष्ट फार प्रकर्षाने मांडली आणि आमचे अन्नधान्याचे साठे लवकर इतरत्र हलवा अशी सूचना केली. कारण यावर्षी गव्हाचे पिक त्यांच्याकडे विक्रमी होईल असा अंदाज आहे.

अन्नधान्याची खरेदी, साठा व पुरवठा करणाऱ्या फूड कार्पोरेशन ऑफ इंडियाकडे मी यासंबंधी विचारणा केली तेव्हा त्यांनी असे सांगितले की देशातील आमच्या कोणत्याही गोडाऊनमध्ये माल ठेवायला जागा शिल्लक नाही. तेव्हा मी त्यांना काही ठिकाणी साखर कारखाने बंद पडले आहेत, काही उद्योग आजारी आहेत त्यांची गोदामे धान्य ठेवण्यासाठी ताब्यात घेऊन तिथे माल पाठवा अशा सूचना केल्या आहेत. जिथे उत्पादन होते तिथे माल ठेवण्याची व्यवस्था महिन्याभरात करावी लागणार आहे. यंदाच्या वर्षी उत्तर हिंदुस्थानात थंडीमुळे गव्हाचे पीक उत्तम आहे तर काही पिकांवर विपरीत परिणाम झाला आहे. महाराट्रात तर आत्ताही पाऊस पडतो आहे. चालू वर्षी मदत वाटण्याचे काम महाराष्ट्र सरकारला करावे लागले. अजूनही पिकांची नुकसानभरपाईच ते देताहेत. निसर्ग कोपला आहे. फयान वादळ झाले कोकणात, मराठवाड्यात, खानदेशात. नाशिक, नांदेड, परभणीत गारांचा पाऊस पडला. जळगावात केळीच्या बागा आडव्या झाल्या. राज्याच्या अनेक भागात यंदा अवेळी पावसाने, वादळाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे चित्र खेडोपाडी पाहायला मिळते आहे. हे सर्व ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम आहेत.

मध्यंतरी 'एफएओ' ही जी युनोची संघटना आहे तीने ग्लोबल वॉर्मिंग व त्याचा अन्नधान्य उत्पादनावर होणारा परिणाम यासंबंधी एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. ४० देशांचे पंतप्रधान त्याला हजर होते. भारत देशाचे प्रतिनिधीत्व माझ्याकडे होते. या परिषदेतले रशियाच्या पंतप्रधानांचे भाषण सर्वांपेक्षा वेगळे व स्मरणात राहिल असे होते. ते म्हणाले, ''आमचा देश हिरे, विविध धातूंच्या खाणी आणि पेट्रोलियम

खाणींच्या विहिरी याकरिता प्रसिद्ध आहे. पण आम्ही आता नवीन रस्त्याने जातोय. पूर्वी ३ ते ४ महिने आमच्याकडे सलग बर्फ असायचा. काहीही पिकायचे नाही. ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम आमच्याकडे असा झाला आहे की बर्फ नष्ट होऊन जमिनी मोकळ्या व्हायला लागल्या आहेत. त्यामुळे यापुढच्या काळात रशिया हे जगाचे फूड बास्केट होईल. जगाने अन्नधान्यासाठी काळजी करायचे नाही. सगळ्या जगाला धान्य रशिया पुरवेल.''

रशियासारख्या काही देशांना ग्लोबल वॉर्मिंगचा लाभ झाला आहे तर काहींना त्याची जबरदस्त किंमत द्यावी लागते आहे. भारत आणि भारताचा परिसर, आशियाखंड याला मोठी किंमत मोजावी लागणार आहे. गव्हाच्या पिकाला थंडी चांगली असे जगातल्या तज्ज्ञांचे मत असले तरीही अेफअेओच्या पॅनेलने जो अहवाल जाहीर केला आहे त्यानुसार थंडीमुळे विपरीत परिणाम होणार आहे तो पंजाब, हरियाना, पश्चिम उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांवर. कदाचित आणखीन २०-२५ वर्षांनंतर हा परिणाम जाणवू लागेल आणि त्याचा महत्वाच्या पिकांवर परिणाम होईल. यंदा गव्हाला अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे उत्पादन वाढतयं. उत्पादन व नियोजनाचे सगळे आकडे चुकताहेत. त्याचे कारण ग्लोबल वॉर्मिंग. त्याचा जनमानसावर प्रचंड परिणाम आहे. त्याची जाण सामाजिक-राजकीय काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना असेल तर तो जनतेत जाऊन त्याबाबत जागृती करू शकेल.

जग बदलतंय आता. आपल्या देशात पुरातन काळापासून एक पद्धत होती. वसुधैव कुटुंबकम. संबंध पृथ्वी हे आता एक कुटुंब होते आहे. आज खऱ्या अर्थाने सर्व देशांच्या सीमा धूसर होऊन देश जवळ यायला लागले आहेत. सबंध युरोपात एक पासपोर्ट, एक व्हीसा आणि एकच चलन करण्याचा विचार चालू आहे. लोक त्या विचारापर्यंत येऊन पोहोचले आहेत. त्याचा सर्वात जास्त परिणाम होतो तो व्यापारावर. तो खुला झाला पाहिजे. तो परस्परांशी केला पाहिजे अशी आग्रही भूमिका लोक मांडू लागले आहेत. अर्थशास्त्राच्या दृष्टीने प्रत्येकाला झळ पोहोचेल असा हा कालखंड आहे. आता आपल्या देशाचा विचार करतो तेव्हा सेवा फक्त भारतापुरत्या नाहीत त्या जगापुरत्या आहेत म्हणून जाणिवपूर्वक प्रोसेस ऑफ लिबरलायझेशनची भूमिका स्वीकारून बंधने कमी करण्याचे सूत्र जसे जगाने स्वीकारले तसे भारतानेही स्वीकारले आहे. त्याचे अनुकूल-प्रतिकूल परिणाम निश्चित होणार.

आठ टक्के विकास दर राहिल्यामुळे भारत जगात बराच



पुढे गेला आहे. सर्वसाधारणपणे ४ ते ६ टक्के विकासदर हा उत्तम समजला जातो. भारताचा विकास दर नैसर्गिक परिस्थिती यंदा प्रतिकूल असतानाही फारसा कमी झालेला नाही हे उल्लेखनीय, वैशिष्ट्यपूर्ण म्हणावे लागेल. यंदा देशातील ३२४ जिल्ह्यात दुष्काळाची स्थिती असतानाही भारताचा विकास दर ७ ते ७.५ टक्के राहील असा अंदाज आहे. याचा अर्थ



भारतातील विविध क्षेत्रातली गुंतवणूक वाढायला लागली आहे. मूलभूत गोष्टींवर अधिक खर्च व्हायला लागला आहे. हे सगळे बदल व त्याचे परिणाम अनुकूल असे होताहेत.

उत्पादन वाढ झाल्यामुळे माणसाची खरेदी करण्याची शक्ती वाढते. क्रयशक्ती वाढल्याने मालाला मागणी चांगली येऊन भाव वधारतात. गेल्याच्या गेल्या वर्षी जगात सगळीकडे मंदीची लाट होती. पण हिंदुस्थानचा ग्रामीण भाग पहिल्यांदा देशाच्या प्रगतीची जी पंगत बसली त्यात येऊन बसला. कारण जे पिकतं त्याला रास्त किंमत देवून जाणिवपूर्वक टाकलेली पाऊले व मोठ्या प्रमाणावर शेतीमाल खरेदीची केलेली कार्यवाही. देशातले ६२ टक्के लोक आज शेतीत आहेत. त्यांची, क्रयशक्ती नसेल तर देश पुढे जायचा कसा ?



*औरंगाबाद येथे नव्याने बांधण्यात आलेल्या राष्ट्रवादी भवनात झालेल्या पत्रकार परिषदेनंतर कार्यकर्त्यांनी शरद पवार यांना भेटण्यासाठी केलेली गर्दी. त्यांच्या पाठीमागे मधुकर पिचड, सतीश चव्हाण व इतर मान्यवर.*

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग आणि आम्ही सगळ्यांनी एकत्र बसून धोरणे ठरविली. अडचणीत सापडलेल्या भागाला व तेथील जनतेला मदत करण्याचे सूत्र स्वीकारून निरनिराळी पॅकेजेस दिली. खानदेश, मराठवाडा, विदर्भ येथले कार्यकर्ते आज मला भेटून सांगताहेत, की अलिकडच्या काळात कधी नाही एवढी आमच्या कापसाला किंमत मिळाली आहे. ३३०० रू. पर्यंत कापूस गेला होता. तो आता तीन हजारावर येऊन थांबला आहे. कापूस उत्पादकांना यावर्षी किती पैसे मिळाले याचा कधी हिशेब केला का ? यावर्षी महाराष्ट्रात २५० लाख टन कापूस खरेदी झाला. त्याची किंमत होते साडे सात हजार कोटी रुपये. म्हणजे शेतकऱ्याच्या घरात पहिल्यांदा एवढी रक्कम गेली. अशीच गोष्ट ऊस उत्पादकांची देखील आहे. त्यामुळे बरीच उलटसुलट चर्चा चालू आहे. पण त्याची चिंता करण्याचे कारण नाही. शेतकऱ्याच्या मालाला रास्त दर मिळावा व त्याने अधिक जोमाने उत्पादन करावे म्हणून जाणिवपूर्वक शेतीमालाच्या आधारभूत किंमती आपण वाढवून दिल्या आहेत. केंद्र सरकारने चांगल्या हेतूने हा निर्णय केला आहे.

गेल्या वर्षी आपण २५३ लक्ष टन गहू आणि ३३३ लक्ष टन तांदूळ खरेदी केला. खरेदी केलेले हे धान्य देशात एकूण उत्पादित झालेल्या धान्याच्या फक्त २० टक्के आहे. या धान्य खरेदीपोटी सरकारने शेतकऱ्यांना ६५ हजार कोटी रुपये दिले आहेत. हा पैसा प्रामुख्याने उत्तर प्रदेश, ओरिसा, पंजाब, हरियाना, आंध्रप्रदेश आणि छत्तीसगड या राज्यात गेला आहे. जिथे तांदूळ व गहू अधिक पिकतो तेथूनच मालाची खरेदी झाली आहे. २० टक्के माल खरेदी केला तर तो ६५ हजार कोटींचा होतो. यावरून देशात उत्पादित शेतीमालाचे मूल्य किती मोठे आहे याचा अंदाज आपल्याला येऊ शकेल.

समाजातला जो गरीब माणूस आहे त्यालाही जगण्याचा अधिकार आहे. १९७८ साली केलेल्या रोजगार हमी कायद्याने हा अधिकार प्रत्यक्ष रोजगार देण्याची भूमिका स्वीकारून मान्य केला आणि आता पार्लमेंटने देखील हा कायदा मान्य करून महाराष्ट्राची रोजगार हमी योजना थोडा बदल करून 'नरेगा' च्या रुपाने स्वीकारली आहे. 'नरेगा' साठी २५ हजार कोटी रुपये आत्तापर्यंत खर्च केले असून हा सगळा पैसा




*किशोर पाटील हे पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचे स्वागत करताना.*
*शेजारी छगन भुजबळ, मधुकर पिचड व इतर मान्यवर.*

कष्टकरी व गरीब माणसाच्या हातात मजुरीच्या रुपाने गेला आहे. पैशाचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर चलनवलन होऊन सामान्य माणसाच्या हातात हा पैसा पडल्यावर त्याची खरेदी शक्ती वाढून त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे काही गोष्टींची चणचण जाणवते. गेली अनेक वर्षे देशातला दुर्लक्षित राहिलेला ६२ टक्के शेतकरी वर्ग आता शक्तीमान व्हायला लागला आहे. यवतमाळ जिल्ह्यात यंदा बँकेतल्या ठेवी वाढल्या आहे. लोक घरावरचे छप्पर बदलताहेत. हीरो होंडा मोटारसायकल बनविणाऱ्या कंपनीचे मालक श्री. मुंजाल हे मध्यंतरी भेटले. ते सांगत होते की सध्या ग्रामीण भागातली टू व्हीलरची गरजच आम्ही भागवू शकत नाही. जो माल सहा महिन्यात आम्ही विकत होतो तो एक महिन्यावर आला आहे. गाड्यांना प्रचंड मागणी आहे ती शेतकऱ्याला मिळालेल्या रास्त दरामुळे.

कोल्हापूरातले आमदार के. पी. पाटील सांगत होते मला त्यांच्या कारखान्याचे उसाला ॲडव्हान्स म्हणून २५०० रुपये भाव जाहीर केला आहे. म्हणजे यंदा ऊस उत्पादक शेतकऱ्याला २७०० ते ३००० रू. भाव निश्चित मिळणार. मला दोन दिवसांपूर्वी माण तालुक्यातल्या एका धनगर शेगर समाजाच्या मुलीचे पत्र आले. ही मुलगी सध्या मास्टर इंजिनिअरिंग करते आहे. तीने पत्रात लिहिले होते की, ‘‘मला पहिली तीन वर्षे शिक्षणासाठी खूप त्रास झाला. वडिलांकडे पैसे नव्हते. पण यंदाच्या वर्षी माझ्या घरी ऊस लावला होता. १८ लाख रुपये ऊसाचे बिल आहे. आता माझ्या शिक्षणाच्या आड काहीही येणार नाही. मी जन्मभर लक्षांत ठेवीन की तुम्ही ऊसाला भाव मिळवून दिला. म्हणून माझं शिक्षण होऊ शकले.’’ शेतकऱ्याच्या घरांत रास्त दरामुळे दोन पैसे व्यवस्थित गेले तर त्याचा किती चांगला परिणाम होतो ही दुसरी बाजू ही आपण सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या कुटुंबात आता बदल होतो आहे.

गरीब लोक देशांत आहेत. महागाईच्या झळा त्यांना बसताहेत. त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी वेगळ्या उपाययोजना केल्या आहेत. पण शेतकऱ्याला त्याच्या मालाचा रास्त भाव देणेही तितकेच आवश्यक आहे. गहू आणि तांदुळाचे भाव अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात किती होते आणि आम्ही आज किती केले आहेत हे पाहिल्यावर आपल्या लक्षात येईल की आम्ही शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून दुपटीने भाव वाढवून दिले आहेत. वाजपेयींच्या काळात गव्हाची आधारभूत किंमत ४९० रू. होती. तो दर यंदा आम्ही ११०० रू. केला आहे. भाताचा दर ४६० रू. होता. तो यंदा १०५० रू. केला आहे. हे सगळे शेतमालाचे भाव वाढवून दिले म्हणून त्याच्या निश्चितपणे झळा समाजातल्या काही वर्गांना



बसताहेत. पण त्यासाठी उपाययोजनाही केली आहे.

अंत्योदय योजनेत देशात अडीच कोटी कुटुंबे आहेत. एका कुटुंबात ५ माणसे धरली तर साधारणपणे दहा ते साडेदहा कोटी लोकांना अंत्योदय योजनेचा फायदा मिळतोय. दारिद्र्य रेषेखाली (बीपीएल) राहणारी सहा कोटी कुटुंबे म्हणजे सुमारे ३० कोटी लोक आहेत. बीपीएल व अंत्योदय योजनेतील लोकांना २००२ साली ज्या दराने धान्य आम्ही पुरवित होतो त्याच दराने आजही पुरवित आहोत. गेल्या आठ वर्षांत या दरात काडीमात्रही वाढ झालेली नाही. अंत्योदय योजनेतील लोकांना दोन रू. किलो गहू व तीन रू. किलो तांदुळ या दराने सरकार धान्य पुरविते. दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) लोकांना ५ रु. किलो गहू आणि ६ रु. किलो तांदूळ या दराने धान्य देतोय. आपण १०५० रू. क्विंटल दराने साळ खरेदी करतो. एक क्विंटल साळीवर भरडण्याची प्रक्रिया केल्यानंतर ६२ किलो तांदूळ मिळतो म्हणजे १६ रू. किंमत तांदुळाची पडते. शिवाय या तांदुळावर प्रक्रिया करण्याचा खर्च वेगळाच. पंजाब, हरियाना सरकारचा यावर १२ टक्के म्हणजे पोत्यामागे ११२ रू. टॅक्स तो यात धरलेला नाही. शिवाय रिकामे पोते ६० रुपयांचे. वर्षभर माल साठवून व्यवस्थित ठेवायचा. त्या गुदामाचे भाडे वगैरे सगळा खर्च हिशेबात धरला तर १९ ते २० रू. किलो दराने सरकारला तांदूळ पडतो आणि बीपीएलमधील लोकांना सरकार ६ रू. किलोने देते. म्हणजे किलोमागे जवळपास १४ रू. नुकसान सरकार सोसते. पूर्वी अन्नधान्य वितरणासाठी १९ हजार कोटी रुपयांची सबसिडी होती. ती आज आम्ही ६० हजार कोटींवर नेली आहे. केवळ गरिब माणसांना रास्त दराने माल मिळावा यासाठी केंद्र सरकारने हे ओझे उचलले आहे.

पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा यांची मागणी आहे की देशातल्या सर्वांना सरकारने स्वस्तात धान्य पुरवठा करावा. पण अन्नविभागाची जी पार्लमेंटरी कमिटी आहे तिच्यापुढे हा विषय गेला तेव्हा त्यांनी तो नाकारला. सवलतीतले धान्य फक्त गरीबांनाच दिले पाहिजे. श्रीमंतांना ते देता कामा नये अशी शिफारस सर्व खासदारांच्या समितीने केली. दारिद्र्य रेषेच्यावरील सर्व लोकांना अधिक धान्य देण्याच्या मागणीचा



*अधिवेशनस्थळी सुनिल तटकरे हे साखरेच्या महागाईचा तर मनोहर नाईक ग्लोबल वॉर्मिंगचा राष्ट्रवादीचा अंक वाचत असताना. शेजारी मंदाताई म्हात्रे, सचिन अहिर, सुबोध सावजी व इतर मान्यवर.*

आपण जरूर विचार करू शकतो. कारण देशात धान्याचा साठा भरपूर आहे. समाजातल्या सर्व वर्गाला त्याच्या गरजेइतके धान्य मिळू शकते एवढा साठा सध्या आपल्याकडे आहे. ६ फेब्रुवारीला पंतप्रधानांकडे झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा पुन्हा नव्याने सर्व्हे करून ज्यांची नावे यादीत नाहीत ती समाविष्ट करण्यात येतील. त्यामुळे अल्पसंख्यांक, आदिवासी, दलित, भटके विमुक्त, विधवा, परित्यक्ता यांना या संवर्गात घालून त्यांनाही त्याचा फायदा देता येईल. यात आपण मोठा समन्वय साधला तो म्हणजे उत्पादकाला त्याच्या मेहनतीची व मालाची योग्य किंमत दिली आणि शेवटच्या माणसाला रास्त दराने माल दिला.

यावर्षी गव्हाची आधारभूत किंमत ११०० रू. क्विंटल केली. कापसाला २७०० ते ३००० रू. किंमत ठेवली. बाजारात ३३०० रूपयांनी कापूस का जात होता. कारण व्यापाऱ्यांना माहिती होती की सरकारनेच ३००० रू. भाव केला आहे. त्यापेक्षा जास्त दराने खरेदी केला तरच शेतकरी आपल्याला कापूस देईल. त्यामुळे कापसाची किंमत टिकून राहण्यास मदत झाली. कष्ट करणाऱ्या माणसाला न्याय देण्याची भूमिका सरकारने स्विकारली त्याचा फायदा देशातील ६२ टक्के लोकांना आज होत आहे. याचा परिणाम देशातील व्यापार व उद्योग वाढल्याशिवाय राहणार नाही. देशातील ६५ टक्के शेतकरी जनतेला दुबळे बनवून व्यापार उद्योग कधीही वाढणार नाही याचे भान आपल्याला कायम ठेवावे लागेल. आज कारखाने औरंगाबाद, सिल्लोड, सोयगांवला नाहीत. ते शहरांमध्ये केंद्रीत झालेले आहेत. खरे तर जिथे कच्च्या मालाचे उत्पादन होते तिथेच त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी केली तर स्थानिक लोकांना रोजगारासाठी बाहेर जाण्याची वेळ येत नाही आणि शेतकऱ्यालाही आपल्या मालाचे दोन पैसे जास्त मिळू शकतात. शेतकऱ्याचे उत्पादन वाढले आणि उद्योगांना रास्त दराने माल मिळू लागला तर अधिक हातांना काम मिळेल. त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

नागरी जीवन आणि ग्रामीण जीवन यांत आज खूप फरक आहे. या देशाच्या सांपत्तिक स्थितीचा विचार केला तर नागरी माणसाचे उत्पन्न ग्रामीण माणसापेक्षा कितीतरी अधिक व सुखवस्तू आहे. काय म्हणून खेड्यापाड्यातील माणसांनी तोटा सोसून शहरातील लोकांना माल द्यायचा? काही वर्षांपूर्वी अकलूजला मोठा कार्यक्रम लेव्हीचा झाला होता. लेव्ही म्हणजे सक्तीने कमी किंमतीत सरकारला माल घालणे. शेतकऱ्याने तोटा सोसून लेव्ही घालणे हे न्याय्य नाही. अगोदरच शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. तो आत्महत्या करतोय म्हणून आमच्यावर एका बाजूने टीका करायची आणि दुसरीकडे त्याचा जीवनस्तर वाढवायला गेलो तर वेगळ्या टीका होताहेत. माझ्यावर तर काहींनी टीकेची झोडच उठवलेली आहे. पण मी आवर्जून तुम्हांला सांगू इच्छितो माझ्याबद्दल फार चिंता करू नका. कालच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत एकजण सुद्धा महागाईबद्दल बोलला नाही. उलट उत्पादन करणाऱ्यांना रास्त

किंमत दिली हे चांगले झाले असे अनेक मुख्यमंत्र्यांनी बैठकीत सांगितले.

इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांनी स्वतःचा टीआरपी वाढविण्यासाठी भाववाढीचा विषय लक्षपूर्वक मोठा केलेला आहे. राष्ट्रवादी मासिकात प्रसिद्ध झालेला अग्रलेख हा त्यामुळेच टीकेचा विषय झालेला आहे. वास्तविक अत्यावश्यक गोष्टीत साखर घालण्याची काहीही आवश्यकता नाही असे अनेकांचे मत आहे. संपादकाचेही तसे आहे असे दिसते. संपादकाला तेवढे लिहायचा अधिकार असला पाहिजे. साखर खाल्ली नाही तर कुणी मरत नाही' असे जर त्यांनी लिहिले असेल तर ते त्यांचे व्यक्तिगत मत आहे. पक्षाचे तसे धोरण नाही. मात्र आम्ही लोकशाही मानतो. त्यामुळे संपादकाचे लेखन स्वातंत्र्यही आम्ही मान्य करतो. बाकी कोणाशीही भांडण परवडते पण प्रसारमाध्यमांच्या लोकांशी भांडण परवडत नाही. तथापि त्यानिमित्ताने एक चांगली गोष्ट झाली की या भाववाढीच्या विषयाची चर्चा झाली. भोंगळे यांच्या अग्रलेखाने राष्ट्रवादी काँग्रेसचा आणि राष्ट्रवादी मासिकाचा प्रचार चांगला केला. देशभरातील अनेकांना त्यामुळे कळून चुकले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रवादी नावाचे मासिक आहे. मानले पाहिजे त्याला हा मासिकाचा प्रचार केल्याबद्दल.



*राष्ट्रवादी भवनाची उभारणी करणारे प्रदीप चव्हाण,*

महागाईच्याबद्दल जाणूनबुजून आपल्याच काही लोकांनी रान उठविले आहे. अवघड जागी कोणी बसला असला तरी त्याची फार चिंता करायची नसते. शेवटी या देशातील धोरणे ही जाणिवपूर्वक केलेली आहेत. त्याचा परिणाम होणारच. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमुळे २५ हजार कोटी रुपये लोकांच्याकडे गेले आहेत. त्यामुळे पैशाचे चलनवलन वाढले आहेत. शेतीमालाच्या चांगल्या किमतींमुळेही काही पैसा सर्क्युलेट झाला आहे. ज्या भागात आपण राहतो तिथे दिवाळीच्या आधी जास्त पैसे आले तर बाजारपेठ वेगळी दिसते की नाही. क्रयशक्ती, खरेदीशक्ती वाढली तर बाजारपेठा भरभरून वाहतात. आपण सध्या सगळेजण या प्रक्रियेतून जात आहोत. त्यामुळे काहींची अडचण होते आहे हे नाकबूल करून चालणार नाही. केंद्रीय अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली या सगळ्या दरांसंबंधी विचार करण्यासाठी समिती नेमलेली आहे. किरकोळ व घाऊक दरातील फरक कितीतरी प्रचंड आहे. लासलगावला ११ रु. दराने खरेदी केला जाणारा कांदा दिल्लीच्या बाजारात २३ ते २४ रु. किलो दराने विकला जातो. शेतकऱ्याला ११ रुपयेच मिळतात. वरचे १३ रुपये मधल्या दलाल व विक्रेत्याला मिळतात. मार्केटिंगचा फायदा किती असावा. या मालाच्या किंमतीवर कोण नियंत्रण करेल? मला हे मान्य आहे की मालाची वाहतूक, अडत्याचे कमिशन, हमाली हे सगळे खर्च त्यात धरावे लागतील. पण तरीदेखील ११ रु. दराचा कांदा २३ रुपयांनी विकणे हे न्याय्य नाही. ही व्यापाऱ्यांनी ग्राहकांची चालविलेली लूट आहे. ही लूट थांबविण्यासाठी काही महत्त्वाची पावले उचलावी लागतील. व्यवस्थेत काही चूक आहे. ती सगळ्यांनी बसून एकत्रित दुरुस्त केली पाहिजे. हे सगळे प्रश्न एकत्रित पद्धतीने पाहून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच त्याचे परिणाम अनुकूल होतील.

हिंदुस्थानात गेली १० वर्षे झाले आपण दरवर्षी कमीत कमी १५ हजार कोटींची डाळ आयात करतो आहोत. कोणाचेही सरकार असले तरी डाळ आयात चालू आहे. बर्मा, अर्जेंटीना, पाकिस्तान यासारख्या चार-पाच देशांतून डाळ आपल्याकडे येते. यंदा या सर्व देशांत डाळींचे उत्पादन कमी झाले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतच डाळींचा तुटवडा निर्माण होऊन भाव वाढले होते. यंदाच्या वर्षी शेतकऱ्यांनी तुरीचे क्षेत्र वाढविल्यामुळे ८० रू. असणारी तूर आता ५२ रुपयांवर



*गुत्तेदार बशीरभाई शेख, विद्युत व्यवस्था करणारे नांदेडकर आणि बुरांडे व आर्किटेक्ट वीरकर यांचा शरद पवार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.*

आली आहे. जगाच्या बाजारातून आपण गरज पडणाऱ्या वस्तू घेतच आहोत. पण त्या मुबलक प्रमाणात जगाच्या बाजारपेठेतही उपलब्ध असणे जरुरीचे आहे. खाद्य तेल २५ हजार कोटी रुपयांचे गेल्या १० वर्षांपासून आपण आयात करतो आहोत.

यंदाच्या वर्षी साखर आयात करण्याची पाळी आली. साखरेचा आंतरराष्ट्रीय बाजारात गेली अनेक वर्षे २३० डॉलर असणारा भाव आज साडे सातशे डॉलरवर गेला आहे. मालाच्या तुटवड्याचा परिणाम केवळ आपल्या एका देशापुरता स्तिमीत नाही. सगळ्या जगाला या भाववाढीची झळ पोहचलेली आहे. आपल्याला साखरेचे उत्पादन वाढविण्यासाठी उसाची दर एकरी उत्पादकता व साखरेचा उतारा वाढविण्याशिवाय पर्याय नाही. चांगल्या प्रकारची बी-बियाणे, खते, सिंचनाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन माल विक्रीची उत्कृष्ट व्यवस्था केली पाहिजे तरच सामान्य माणसाची अन्नधान्याची गरज भागू शकेल. तोच जर नाऊमेद झाला. आणि स्वतःच्या गरजेपुरतेच उत्पादन करू लागला तर मात्र सगळ्यांचीच अडचण होऊ शकते.

आता बियाण्यांच्या प्रश्नावरून नवीन वाद निर्माण केला जात आहे. कसले बियाणे पाहिजे आम्हाला. परंपरागत पद्धतीच्या बाहेर आम्हाला जायचे नाही असे काही लोक म्हणताहेत आणि त्यामुळे त्यांच्याकडून नवीन जातीच्या बियाण्यांना विरोध होतो आहे. आपले माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी हायब्रिड बियाणांचा प्रचंड आग्रह धरून प्रचार केला. लोक त्यांची टिंगल करायचे. झोपेत बोलले तर हायब्रिड लावा असे बोलतील असे म्हणायचे. पण त्यांनी यासंबंधी परखड भूमिका घेऊन देशवासियांना ती पटवून देण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्रींच्या समोर त्यांनी बैठकीत जाहिरपणे सांगितले होते की अन्नधान्याचा प्रश्न मी सोडविला नाही तर पुण्यातील शनिवारवाड्यासमोर मला फाशी द्या. हायब्रिड बियाण्यांचा वापर करून त्यांनी महाराष्ट्रातील अन्नधान्याचे उत्पादन प्रचंड वाढविले. जो माल व उत्पादन वाढवायला मदत करतो त्या रस्त्याने जायचे की कुणीतरी उत्पादन घटवायला निघालेला आहे त्याच्या मार्गाने जायचे याचा विचार आपण केलेला बरा.

एखादे बियाणे आरोग्याला, पर्यावरणाला, प्राणीमात्राला, पक्षांना घातक असेल तर ते कुणी ठरवायचे? ते तज्ज्ञांनी ठरविले पाहिजे. आज या बाबतचा निर्णय पर्यावरण मंत्रालय घेत आहे. आज देशात बिटी कॉटनची चर्चा चालू आहे. बिटी वांग्यालाही विरोध होतो आहे. एकदा जर ही गोष्ट किंवा बियाणे सुरक्षित आहे असे तज्ज्ञांनी सांगितले तर त्याबद्दल कुणी शंका उपस्थित करण्याचे कारणच काय? आज देशात ९० टक्के कापसाचे क्षेत्र बिटीखाली आहे. आता बिटीचे बियाणे लावल्याशिवाय कोणी थांबतच नाही. पाच वर्षांपूर्वी या बिटी बियाणालाही विरोध झाला होता. सोयाबिन तेल अमेरिका व अन्य देशांतून आपल्याकडे येत आहे. जेनेटिकली मॉडिफाईड फूड ज्या देशात वापरले जाते त्या अमेरिका,




***औरंगाबाद येथे नव्याने बांधण्यात आलेल्या राष्ट्रवादी भवनाचे उद्घाटन झाल्यानंतर या भवन उभारणीसंबंधीची माहिती अजित पवार हे शरद पवार यांना देत असून शेजारी मधुकर पिचड, विक्रम काळे व इतर मान्यवर.***

युरोपात त्याला विरोध आहे. त्यांना जे नको आहे ते आपल्याला विकताहेत. त्याचे पैसे घेताहेत. थोडक्यात म्हणजे आपल्याकडे जादा झालेला माल ते जागतिक बाजारपेठेत विकण्याचा प्रयत्न करताहेत. आपणही तसाच प्रयत्न केला पाहिजे आणि शास्त्रीय दृष्टीने उत्पादकता वाढविण्याकडे बघितले पाहिजे. हे सर्व करतांना आपल्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा शास्त्रीय असला पाहिजे.

सगळ्या जगात आणि आमच्याकडे प्रश्न वेगळेच आहेत. म्हणे मुंबई महाराष्ट्राची. कोण बाजूला करायला निघालयं. कोण म्हणतयं मुंबई महाराष्ट्रापासून तोडा. तशी कोणी मागणी केली आहे का? म्हणजे जो प्रश्नच नाही तो कशाकरिता उकरून काढायचा? मराठीचा अभिमान कोणाला नाही? सगळेजण मराठी बोलतात. अनेक आपले सहकारीही उत्तम मराठी बोलतात. मग त्या भाषेच्या प्रश्नांत कशाला राजकारण आणायचे ? तसेच खेळाचेही आहे. खेळांत राजकारण आणण्याची गरजच काय? निव्वळ रडीचा डाव चालू आहे. ऑलिम्पिकला आपली टीम जाणार. तिथे पाकिस्तानचे खेळाडू खेळणार नाहीत का? ऑस्ट्रेलियात भारतीयांवर हल्ले होताहेत त्याबद्दल काळजी घेण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने त्या सरकारला सांगते आहे. पण त्यांना आमच्या येथे खेळू द्यायचे नाही अशी भूमिका घेण्यात अर्थ काय? गंमतच आहे काही गोष्टींबाबत. काही प्राणी असतात. घराच्या जवळपास आले की गुरगुरू लागतात. आता वय झाले आहे. नव्या पिढीला काही राष्ट्रीय विचार सांगायचे की नाही. मी सांगणार आहे त्यांना भेटायला जाऊन. आमची जुनी मैत्री आहे. कशाला या भानगडीत पडता. दोन मुले खेळायला आली तर त्यात आपले काय जातेय? पाकिस्तानमध्ये श्रीलंकेच्या टीमवर हल्ला झाला. गेल्या दोन वर्षात एकही संघ तिथे खेळायला गेला नाही. खेळाडूंचे प्रचंड नुकसान झाले आहे. आज देशातील कुठल्याही कानाकोपऱ्यात बघा. मुले कसले का होईना फळकूट घेऊन तीन काटक्या लावून क्रिकेट खेळतच असतात. हिंदुस्थानातील सगळ्या खेड्यापाड्यातून हे चित्र दिसते. त्यातूनच तेंडूलकर तयार होऊन देशाचा नावलौकिक वाढेल. कुणीतरी घरातच सत्यानाश केला तर त्याचा राग जगातील पोरांवर काय काढताय?

मुळातच जे प्रश्न नाहीत ते उपस्थित करण्याचा

प्रयत्न करू नये. मुंबई महाराष्ट्राचीच राजधानी आहे. दिल्लीच्या करोलबागेत अडीच लाख मराठी लोक राहतात. दोन लाख लोक बंगलोरमध्ये राहतात. हा देश सगळ्यांचा आहे. मग जाणिवपूर्वक परभाषियांना त्रास का दिला जातोय? का त्यांच्यापुढे संकट उभे केले जातेय? श्रीलंकेपासून नेपाळपर्यंत सोने गाळणारा मनुष्य सातारा जिल्ह्यातील आहे. देशभर कुठेही जा सोन्याच्या धंद्यात खटावचा मनुष्य भेटतो. रामराम साहेब, असे त्याने म्हटलं की आपण ओळखावे की हा सोने गाळणारा आहे. दक्षिणेकडे लुंगी घालून तो आपल्या समोर येतो पण मुलांना मुली इकडच्याच करतो. बाकी सगळे तिकडचे. हा देश एकमेकांनी सांभाळलाय.



*अधिवेशनस्थळी व्यासपीठावर आगमन झाल्यानंतर उपस्थितांना अभिवादन करताना शरद पवार, शेजारी छगन भुजबळ, मधुकर पिचड आणि हबीब फकी.*

आज मुंबईच्या प्रगतीत सबंध हिंदुस्थानचा हात आहे. पारशी समाजाचे मोठे योगदान आहे. जमशेटजी टाटा यांनी कारखानदारीचा येथे पाया घातला. गुजराती वर्ग येथला नसला तरी बाहेरून येऊन त्यांनी कारखानदारी उभी केली. मोफतलाल आणि अन्य सगळ्या माणसांनी कपड्याच्या मिल उभ्या केल्या. मारवाडी समाज खेड्यापाड्यात गेला. सगळ्यांनी हातभार लावला त्यातूनच देशाची उभारी व भरभराट झालेली आहे आणि म्हणून आपण सगळे भारतीय आहोत. राज्य व मातृभाषेचा अभिमान असणे रास्त आहे. पण इतर भाषांचा आदर करण्याची भूमिकाही तितकीच न्याय्य आहे. त्यामुळे आपण तसेच धोरण ठेवले पाहिजे. राष्ट्र, राज्य व मातृभाषेचाही विचार करून आपण इतर भाषिकांचा विचार करणार आहोत. कारण ते भारतीय आहेत. देशाच्या विकासासाठी आपण सारेजण एकत्र येऊया. हीच आपली यापुढची कामाची दिशा असली पाहिजे. काही दिवसांपूर्वी निवडणुकीत मला औरंगाबाद, नाशिक, चंद्रपूर, नागपूरला हिंदी भाषिकांच्या प्रचारासाठी स्वतंत्र सभा घ्याव्या लागल्या इतकी त्यांची संख्या वाढलेली आहे. महाराष्ट्रात अनेकांच्या घरात स्वयंपाक करणारा महाराज हा राजस्थानचा आहे. कित्येकांच्या घरात गायी-म्हशी आहेत. पण जनावरांच्या धारा काढायला उत्तर प्रदेश-बिहारचा माणूस आहे. हे लोक एकमेकांच्या परिसरात जाऊन आपल्या कामातून एकात्मता निर्माण करताहेत. महाराष्ट्राच्या चित्ररथाला यावर्षी २६ जानेवारीच्या संचालनात पहिले पारितोषिक मिळाले. हा रथ डबेवाल्यांचा होता. बहुतांश डबेवाले लोक हे वंजारी समाजातील आहेत. संगमनेर, सिन्नर तालुक्यातील हे लोक घरोघरी डबे पोहचवताहेत. डबे पोहचविणारे हे काही मूळ मुंबईकर नाहीत. ते सगळे बाहेरचे आहेत. मी काय, जयंत पाटील काय, मुंबईत राहतो. मग आम्ही काय मुंबईकर आहोत का? आज ग्रामीण महाराष्ट्राकडे व भारताकडे लक्ष दिले तरच चित्र बदलेल. ग्रामीण भागाकडे लक्ष देत असतानाच नागरी परिसराकडेही दुर्लक्ष करुन चालणार नाही. कारण आणखीन १० वर्षांनी आपली ५० टक्के लोकसंख्या ही नागरी झालेली असणार आहे. तेथील घरे, पाणी, भाषा व इतर विकासाच्या सर्व प्रश्नांत लक्ष घालून आपल्या सर्वांना त्यांना दिलासा द्यावा लागेल. लोकांच्या कामातून विश्वास संपादूनच पक्ष मोठा व मजबूत होईल. त्या दिशेने जाण्याची प्रेरणा आपण या शिबिरातून घ्यावी आणि तशी ती आपण घ्याल अशी आशा करतो.

■■■

# औरंगाबादच्या राष्ट्रवादी भवनाचे उद्घाटन





*शरद पवार हे फीत कापून राष्ट्रवादी भवनाचे उद्‌घाटन करीत असून शेजारी मधुकर पिचड, अजित पवार, सतीश चव्हाण, राजेश टोपे, बबनराव पाचपुचे, जयदत्त क्षीरसागर व अन्य मान्यवर.*

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने औरंगाबाद हे महत्त्वाचे केंद्र असून येथे आपला ठसा कामातून उभा राहिला पाहिजे. येथील विधानपरिषदेच्या एकाचजागेवर आपल्याला समाधान मानता येणार नाही. आपल्या पक्षाचा येथे विस्तार जिल्हा परिषद, महापालिका आणि विधानसभेतही झाला पाहिजे. आपल्या या कामाला जनतेचा आधार आहे हे चित्र जेव्हा निर्माण होईल, तेव्हा मराठवाड्याची चिंता मला वाटणार नाही'', या शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठामंत्री शरद पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

औरंगाबाद येथे नव्याने उभारण्यात आलेल्या राष्ट्रवादी भवनचे उद्‌घाटन श्री. पवार यांच्या हस्ते ७ फेब्रुवारी, २०१० रोजी झाले. त्यावेळी ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड होते.

श्री. पवार पुढे म्हणाले, की आपल्या सर्वांच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा असा आजचा दिवस आहे. भव्य असे शिबीर आज आपण येथे संपन्न केले असून तो आनंद द्विगुणीत करण्यासाठी पक्षाच्या मालकीचे जे भव्य कार्यालय उभे केले आहे त्याचे आज उद्‌घाटनही करीत आहोत. अशीच एक सुंदर वास्तू श्री. छगन भुजबळ यांनी नाशिक येथे भुजबळ नॉलेज सिटी या नावाने उभारली आहे. ते एक अद्यावत असे शिक्षण संकुल आहे. शेवटी कार्यकर्त्यांना बसायला आसरा असावा लागतो. ही एवढी उत्तम वास्तू बांधल्यानंतर तिचा वापर दोन कारणांसाठी व्हावा.

१) नागरिकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे महत्त्वाचे स्थळ कुठले तर लोकांना या वास्तुची आठवण व्हावी आणि

२) राजकीय कार्यक्रम नसतात तेव्हा इतर कार्यक्रमांना (उदा. शैक्षणिक कोर्सेस सुरू करा ज्यातून मुलांना मदत होईल) हॉल दिवसाच्या पद्धतीने किंवा काही तासांवरती देऊन त्यातून येणाऱ्या शुल्कातून देखभाल खर्च केला जावा.

प्रांताध्याक्षांच्या ऑफिसपेक्षा जास्त चांगले कार्यालय औरंगाबाद येथे उभारून कामाचा दर्जा उत्तम ठेवल्याबद्दल आणि बांधकाम गुणवत्तेकडे लक्ष देऊन आधुनिक पद्धतीने भवनाची उभारणी केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करून श्री. पवार म्हणाले की, सगळ्यांच्या सामुदायिक प्रयत्नातून वास्तु उभी राहिली आहे. १४ मार्च, २००९ ला काम सुरू झाले होते. एक वर्ष पूर्ण व्हायच्या आत वास्तू उभी राहिली आहे.



*राष्ट्रवादी भवनाच्या उद्‌घाटनप्रसंगी अनौपचारिक गप्पात रमलेले अजित पवार, सुप्रिया सुळे, राजेश टोपे आणि जितेंद्र आव्हाड.*

सिंधुदुर्ग येथेही वास्तुचे काम चालू आहे. किशोर पाटील, सतीश चव्हाण, मधुकर मुळे, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार आणि राजेश टोपे या सगळ्यांची साथ मिळाली म्हणून ही देखणी वास्तू उभी राहू शकली. आता अन्य जिल्ह्यांनी यापासून आदर्श व प्रेरणा घेऊन तसे काम आपापल्या जिल्ह्यात व तालुक्यात करून दाखवावे.

उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले की, मराठवाड्यात पूर्ण यश मिळवायचे असेल तर त्याची सुरुवात औरंगाबादपासूनच होते. मराठवाड्यात पक्षाचे काम अधिक जोमाने करता यावे म्हणून या वास्तुचा उपयोग करता येईल. या निवडणुकीत अतिशय चांगले काम करून दाखवाल अशी अपेक्षा करतो.

यावेळी राज्याचे जलसंपदा व ऊर्जामंत्री श्री. अजित पवार म्हणाले की, श्री. दिलीप वळसे-पाटील हे औरंगाबाद जिल्ह्याचे संपर्कमंत्री असताना त्यांनी वास्तू उभारण्याचे मनावर घेऊन त्या दृष्टीने जागा मिळविण्याचा प्रयत्न केला. राजकीय दृष्ट्या एक महत्त्वाचे केंद्र म्हणून आम्ही औरंगाबादकडे बघतो. त्यामुळे पक्षाचे कार्यालय येथे असणे अत्यंत आवश्यक होते. पवार साहेबांना मनापासून पाठबळ देण्याचे काम मराठवाड्याने आजपर्यंत केले आहे. श्री. किशोर पाटील, दिलीप वळसे-पाटील व आमदार सतीश चव्हाण या सर्वांनी पाठपुरावा केला म्हणून ही वास्तू उभी राहू शकली. १४ हजार चौरस फुटाची जागा सिडकोकडून विकत घेण्यात आली असून, या भवनात ५ हजार चौ. फुटांचा हॉल बैठकीसाठी करण्यात आलेला आहे. तसेच सर्व पदाधिकाऱ्यांना बसण्यासाठी उत्तम केबिन्स करण्यात आल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद मराठवाड्यात वाढावी आणि राष्ट्रवादीचा विचार सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे काम या वास्तुतून घडावे अशी आमची अपेक्षा आहे. खूप चांगल्या प्रकारची वास्तू उभी केलेली असून, तिची स्वच्छता व्यवस्थितपणे राखली जाईल



*अजित पवार हे कामातले बारकावे सतीश चव्हाण यांना समजून सांगताना.*



*राष्ट्रवादी भवनात गप्पांत रमलेले अजित पवार, लक्ष्मणराव ढोबळे, सतीश चव्हाण, चंद्रशेखर घुले, प्रमोद हिंदुराव व इतर मान्यवर.*

आणि छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांची कामे या वास्तूतून पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. मी स्वतः औरंगाबादचा संपर्कमंत्री असल्यामुळे १५ दिवसांतून एकदा येथे येऊन बसणार आहे व या भवनातूनच कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडविणार आहे. या भवनाच्या बांधकामासाठी आमदार सतीश चव्हाण यांनी खूप लक्ष दिले. त्यांचे बंधू प्रदीप चव्हाण यांनी वेळेच्या अगोदर बांधकाम पूर्ण करून कामाची गुणवत्ता उत्तम राखली आहे. जळगाव, धुळे आणि सातारा या तीन जिल्ह्यात अशीच पक्षाची कार्यालये उभारली असून, आता बीड येथेही नव्याने कार्यालये उभे करण्यात येणार आहे. त्याचे नुकतेच भूमीपूजन केले आहे. सोलापूर, सांगली आणि नाशिक येथे अजून पक्षाची कार्यालये उभी राहिलेली नाही. तिथे अशी कार्यालये उभी राहावीत आणि त्या कामात त्या जिल्ह्यातील नेत्यांनी लक्ष घालावे अशी अपेक्षा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रत्येक जिल्ह्यात स्वतःचे कार्यालय असावे, अशा दृष्टीने प्रयत्न करून लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. या पक्षाच्या कार्यालयात बसून कार्यकर्ते व नेते जनतेचे प्रश्न प्राधानान्ये सोडवतील, अशी आशा करतो.

''राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्वतःचे घर या भावनेने कार्यकर्ता या कार्यालयाकडे पाहतो आणि त्यामुळे कार्यकर्त्यांचे चेहऱ्यावर आज आनंद ओसंडून वाहतो आहे'', असे सांगून सार्वजनिक बांधकाममंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, पक्षावर व पवारसाहेबांवर आमचा प्रचंड विश्वास असून पक्ष मजबूत व विस्तृत करण्याचे काम मराठवाड्यातील आम्ही सर्व कार्यकर्ते एकदिलाने करू. प्रदेशाध्यक्ष मधुकर पिचड यांनी ''मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम केले तर पुढच्या निवडणुका काहीही अवघड नाही,'' असे सांगितले. आमदार विक्रम काळे यांनी सर्वांचे स्वागत केले.

■■■

# औरंगाबाद येथील राज्यस्तरीय शिबिराचा वृत्तांत

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने औरंगाबाद येथील सूर्या लॉन्सवर ६ व ७ फेब्रुवारी, २०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिबिराचे उद्घाटन केंद्रीय विमान वाहतूक मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल यांच्या हस्ते झाले. शिबिराचे संयोजक श्री. वसंत वाणी यांनी सुरुवातीला शिबीर संयोजनामागील संकल्पना विषद केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) श्री. जयदत्त क्षीरसागर आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी झालेली प्रमुख मान्यवरांची भाषणे पुढीलप्रमाणे :

## जातीयवाद्यांशी कधीही समझोता नाही



### मधुकरराव पिचड, (प्रदेशाध्यक्ष)

विधानसभा निवडणुकीनंतर आपण प्रथमच एकत्र येत आहोत. मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकीत झालेल्या चुकांचा आढावा घेऊन भविष्याचा वेध घेत आपल्याला पुढे जायचे आहे. देशात आणि जगात कोणते प्रश्न आहेत, त्यांची सोडवणूक कशी करायची यासंबंधीचे ज्ञान कार्यकर्त्यांना व्हावे आणि त्यांची वैचारिक बैठक पक्की व्हावी या हेतूने शिबिराचे आयोजन केले आहे. लोकशाही व राज्यघटना मानणारा आपला पक्ष असून जातीयवादी पक्षांशी आपण कधीही समझोता करणार नाही ही पक्की खूणगाठ मनाशी बाळगा. भविष्यातही आपल्याला याच पद्धतीने वाटचाल करून जातीयवाद्यांना बाजूला सारायचे आहे.

आपल्याला मिळालेले श्री. शरद पवार साहेबांचे नेतृत्व सर्वसमावेशक असून प्रचंड दूरदृष्टीचे आहे. छत्रपती शाहू महाराजांनंतरचे सर्व समावेशक व जाणते नेतृत्व म्हणून श्री.

शरद पवार यांचाच उल्लेख करावा लागतो. मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यात पवारांनीच पुढाकार घेऊन वेळोवेळी अल्पसंख्यांकांना संरक्षण व विकासात सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने पाऊले टाकली आहेत. महिलांना देशात प्रथम आरक्षण त्यांच्यामुळेच मिळाले. आता यापुढे ५० टक्के आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना मिळणार असल्यामुळे आपल्यालाही सक्षम व चांगले काम करणाऱ्या महिलांना पक्षांत पुढे आणून संधी द्यावी लागेल. युवकांनाही यापुढील काळात संधी देऊन त्यांची संघटना मजबूत करायची आहे. नवीन लोकांना बरोबर घेऊन नव्या विकासाला प्रारंभ करायचा आहे.

आम्ही कोणी मोठे नाही. आम्ही सर्व कार्यकर्ते आहोत याच भावनेने आम्हाला संघटना वाढवायची आहे. श्री. शरद पवार हेच आमचे नेते आहेत आणि त्यांचे विचार हेच आम्हाला मोठे मार्गदर्शक आहेत. एक कमांड नेतृत्वाचा आमचा पक्ष आहे. शिस्तीने पक्ष वाढविण्याचे आणि पवार साहेबांच्या नावाला साजेसे असे काम आपल्या सर्वांना करायचे आहे. त्यादृष्टीने आपण एक होऊन व आपल्यातील सर्व मतभेद गाडून एकदिलाने कामाला लागू या. सामुहिक व संघटितपणाने काम करू शकलो तर आपला पक्ष राज्यात आज एक नंबरचा आहेच पण तो अधिक मजबूत होऊन स्वबळावर सत्तेत येऊ शकतो.

# राजकारणाचा केंद्रबिंदू पवारसाहेबच...



## श्री. प्रफुल पटेल

**(केंद्रीय नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री) :**

पवार साहेबांचे नेतृत्व आणि कर्तृत्व यामुळे एक वेगळी छाप जनसामान्यात आपल्या पक्षाची आहे. पवार साहेबांबरोबर काम करताना २५ वर्षे कशी गेली ते मला कळलेच नाही. खूप गोष्टी मी त्यांच्यापासून शिकलो. ते आज आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आहेत ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. मोठी दृष्टी व मोठा व्याप असलेले आणि सर्व धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन जाणारे असे पवार हे सर्वमान्य नेते आहेत. म्हणूनच गेल्या १०-११ वर्षांपूर्वी निर्माण झालेला आपला पक्ष महाराष्ट्राच्या बाहेर व देशभरात सर्वत्र रुजू शकला आहे. पवार हे देशातले सर्वमान्य नेते आहेत. राजकारणाचा केंद्रबिंदू पवार साहेबच आहेत. ते सत्तेत असो व नसो. राज्यातला सर्वात मोठा नेता म्हणून आज आदराने पवार साहेबांकडे पाहिले जाते. म्हणूनच त्यांना टारगेट करून, जाणीवपूर्वक टीकेचा भडीमार करून बदनाम करण्याचा प्रयत्न काही लोकांनी चालविला आहे.

दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की हल्ली आपले जवळचे काही लोकही त्यांच्यावर हेतूतः खोटीनाटी टीका करून लोकांची दिशाभूल करताहेत हे बरोबर नाही. कुठलाही महत्त्वाचा निर्णय करण्यापूर्वी पतंप्रधान हे पवार साहेबांचे

म्हणणे ऐकून घेतात. त्यांना विचारल्याशिवाय कोणताही निर्णय होत नाही. देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्याचा निर्णय पवार साहेबांनी करून त्या दिशेने सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. मागील पाच-सहा वर्षांपासून शेतकऱ्यांना ताकद देऊन आत्मनिर्भर करण्याच्या पाठीमागे ते आहेत. मी गरिबांची, शेतकऱ्यांची बाजू घेतो ही कदाचित माझी चूक असू शकते असे ते नेहमी म्हणतात. पण त्याचवेळी उसाला, धनाला जास्त भाव मिळाला पाहिजे ही काळजी घेताना दुसऱ्या बाजूला गोर-गरिबांना व दारिद्र्य रेषेखालील लोकांना स्वस्तात धान्य मिळाले पाहिजे यासाठी लागणारी व्यवस्थाही ते करतात.



*प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ प्रसन्न मूडमध्ये.*

गेल्या अनेक वर्षांपासून म्हणजे अगदी विरोधक सत्तेवर होते तेव्हाही ३५ ते ४० लाख टन डाळ आपण बाहेरून आयात करीत होतो. गेल्या काही महिन्यात डाळीचे भाव प्रचंड वाढले. कारण जगात फक्त ५० लाख टन डाळ विक्रीसाठी उपलब्ध होती. त्यातली ४० लाख टन भारत खरेदी करणार म्हटल्यावर मागणी व पुरवठ्याचे प्रमाण व्यस्त होते. यावर्षी देशांत पुरेसा पाऊस झाला नाही तर त्याची जबाबदारी पवारांची आहे का? ३२५ जिल्ह्यांत यंदा दुष्काळ आहे त्याबद्दल पवारांना कसे काय दोषी धरता? दुष्काळामुळे उत्पादन घटले आणि वस्तूंचे भाव वाढले. पण सर्व टीका पवारांवर. यामागे निश्चित राजकारणाचाही काही भाग आहे. महाराष्ट्रातील काही नेत्यांना पवारांवर टीका केल्याशिवाय बरेच वाटत नाही. पण त्यांना समजत नाही. पवारांवर टीका करून ते काही मोठे होणार नाहीत. शेतकऱ्यांना ७१ हजार कोटींची कर्जमाफी मिळाली त्याचे सारे श्रेय पवारांना दिले पाहिजे. पण ते श्रेय पवारांना द्यायला आमचे काही सहकारी तयार नाहीत. मग या भाववाढीची सगळी जबाबदारी एकट्या पवारांचीच आहे असे कसे म्हणता? या महागाईबद्दल एकट्या पवारांना अजिबात जबाबदार धरता येणार नाही. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे ही भाववाढीची वेळ आली आहे याचे भान टीकाकारांनी ठेवले पाहिजे.



*अधिवेशनस्थळी गंभीर विषयावर चर्चा करताना प्रफुल्ल पटेल आर. आर. पाटील आणि मनमोहनसिंग ओबेरॉय.*

आपल्या पक्षाची स्थिती सर्व राज्यात व राज्यातील सर्व जिल्ह्यात चांगली आहे का? याबाबतचे आत्मचिंतन राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी करणे गरजेचे आहे. स्वबळावर आपला पक्ष मजबूत आहे का? हेही एकदा तपासून पाहिले पाहिजे. कदाचित यापुढच्या काळात आपल्याला स्वबळावर लढावे लागेल. त्यादृष्टीने अजून पक्षांत खूप काम करण्याची गरज आहे. या शिबिराचे सार्थक करायचे असेल तर गावागावात आपला पक्ष, त्याचे महत्त्व हे कामातून प्रस्थापित करावे लागेल. प्रसंगी सकारात्मक संघर्षाची भूमिकाही घेऊन कार्यकर्त्यांना उभे राहावे लागेल. त्यादृष्टीने नेते तयारी करतील अशी आशा करतो.

# कार्यकर्त्यांना सन्मानाने वागविले पाहिजे

## गोविंदराव आदिक

**(खासदार व राष्ट्रीय सरचिटणीस) :**



पक्षातल्या कार्यकर्त्यांनी स्वतःच स्वतःचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. कुणी कुणाला शहाणपण शिकविण्याची आवश्यकता नाही. दोषासाठी एक बोट जेव्हा आपण दुसऱ्याकडे करतो तेव्हा तीन बोटे आपल्याकडे असतात याचे भान सगळ्यांनी ठेवले तर पक्षवाढीला काहीही अडचण येणार नाही. त्यामुळे आत्मपरीक्षण सगळ्यांनी करणे गरजेचे आहे.

पक्षाचा आलेख कधी आपण नीट पाहिला आहे का? अलीकडच्या काळात आपला आलेख (ग्राफ) खाली चालला आहे. कदाचित मी हे जे काही बोलतो आहे ते काही लोकांना आवडणार नाही. पण कधीतरी खरे बोललेच पाहिजे. नाहीतर नेत्याला आपण फसवितो असे होईल. पवारसाहेब हे आपले नेते आहेत. नेत्याच्या विश्वासाला पात्र राहील असे काम कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. राष्ट्रवादीचा ग्राफ ज्या पद्धतीने वर गेला तसा ग्राफ मला जगात व देशात इतर कोणत्याही पक्षाचा सापडला नाही. अनेकांनी आयुष्ये घालविली पण त्यांना सरकारात जाता आले नाही. पण आपला पक्ष भाग्यवान आहे. पवारसाहेबांच्या कर्तृत्वामुळे आपला पक्ष सुरुवातीपासून सत्तेत आहे. लोकांचा त्यांच्यावर विश्वास आहे.

पक्षाचे नेते व पदाधिकारी यांनी कार्यकर्त्यांना मानसन्मानाने वागविले पाहिजे. कारण त्यांच्या जीवावर आपला पक्ष आहे. कार्यकर्ते खाली तळागाळात राबतात. प्रत्यक्ष मतदारांपर्यंत जाऊन पक्षाचा नावलौकिक वाढवितात. अशा कार्यकर्त्यांना सन्मानाने वागविले जात नाही, अशी बऱ्याच जणांची तक्रार व ओरड आहे. मंत्र्यांनी जिल्हा पातळीवर गेल्यावर पक्षाच्या जिल्हाध्यक्षाला व तालुका पातळीवर गेल्यावर तालुका अध्यक्षाला गाडीत घेऊन त्याच्याशी चर्चा केली पाहिजे. चांगले निर्णय घेऊन नुसते भागणार नाही. ते तळागाळातील लोकांपर्यंत कसे जातील हे पाहायला हवे. आजपर्यंत सरकारने अनेक चांगले निर्णय घेतले. पण ते शेवटच्या गरजू माणसांपर्यंत पोहोचले आहेत असे म्हणण्याचे धाडस कुणी करणार नाही. पक्ष संघटनेला मजबूत करून कार्यकर्त्यांना शिस्त लावण्याचे कामही करावे लागणार आहे. पक्षांत शिस्त आणण्याची आवश्यकता आहे.



आज मंत्र्यांच्या दालनात गर्दीच गर्दी असते. समाजाचे सामुहिक प्रश्न किती लोक घेऊन येतात? जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्र्यांच्या दालनात गर्दी झाली तर मी समजू शकतो. पण बहुतांश लोक स्वतःचे प्रश्न सोडविण्यासाठी

तिथे गर्दी करतात असे आढळून येते. पवार साहेबांनी किती काळ काम करायचे हे आपण कधी तरी ठरविले पाहिजे. साहेब रोज १८-२० तास लोकांसाठी काम करतात. आम्ही किती काम करतो यावर पक्ष वाढणार आहे की नाही हे ठरणार आहे. पवारसाहेबांच्या नावाला साजेसे असे काम आपण करूया.

पक्षाचे मंत्री व पदाधिकाऱ्यांना माझी विनंती आहे की येत्या ८ ते १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी, वेगवेगळ्या महामंडळाचे पदाधिकारी आणि समित्यांचे सदस्य नेमा. सरकारी यंत्रणा व पक्षसंघटना सक्षम कार्यरत करा. महागाईच्या प्रश्नांवरून आज पवारसाहेबांना बदनाम केले जात आहे. वास्तविक त्यांच्यावर या प्रश्नाची काहीही जबाबदारी नसताना जाणीवपूर्वक विष पेरण्याचे काम चालू आहे. आपण लोकांमध्ये जाऊन या खोट्या टीकेला उत्तर दिले पाहिजे. याबाबत कार्यकर्त्यांनी स्वस्थ बसू नये. राष्ट्रवादी जन्माला आली आहे ती जाण्यासाठी नाही, राहण्यासाठी आली आहे याचे भान ठेवून कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे एवढीच अपेक्षा व्यक्त करून मी येथे थांबतो.

# वीज चोरणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा द्यावी



## अजित पवार

**(जलसंपदा व ऊर्जामंत्री) :**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकासमोर ठेवून आपण या शिबिराचे आयोजन केले आहे. आगामी एप्रिल महिन्यात नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, औरंगाबाद यांसारख्या महानगरपालिकांच्याही निवडणुका आहेत. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी न करता एकमेकांच्या विरुद्ध लढले तर भाजप-सेनेला संधी मिळते आहे हे लक्षात घेऊन एकत्रित लढण्यासंबंधी आमचे प्रयत्न चालू आहेत. काँग्रेसमधल्या काही नेत्यांशी याबाबत मी बोललो आहे.

मुंबई महापालिकेचा पाण्याचा प्रश्न मागे काही दिवसांपूर्वी गंभीर झाला होता. आम्ही सारे जण एकत्र बसलो आणि सातव्या दिवशी प्रश्न सुटला. मुंबईतला विजेचा प्रश्नही असाच गंभीर बनला आहे. रिलायन्स, टाटा, बेस्ट या वीज पुरविणाऱ्या कंपन्यांचे वीजेचे दर वेगवेगळे आहेत. हे सर्व दर एक करून एकत्रित काही काम करून विजेची घडी नीट बसविता येईल का? या दृष्टीने काही एक विचार व प्रयत्न चालू आहेत.

राज्यात सर्व ठिकाणी राष्ट्रवादी भवन असावे अशी इच्छा आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस जिथे काही करू इच्छिते त्या भागातील कार्यकर्त्यांना एकत्रित येण्याकरिता जागा असावी म्हणून ही भवने आवश्यक आहेत. ही भवने बांधण्यासाठी पक्ष काही मदत निश्चित करेल. मात्र प्रत्येक

जिल्ह्याच्या नेत्यांनी यात लक्ष घालून ही भवने तातडीने कशी उभी राहतील हे पाहावे. काही काही ठिकाणी पदाधिकारी इतके चुकीचे वागताहेत की जिल्हाध्यक्षांना तुरुंगात जावे लागले आहे. असल्या कार्यकर्त्यांना जेलमध्ये जायच्या आधीच काढून टाका. त्यामुळे निदान पक्षाची बदनामी तरी वाचेल. मध्यंतरी आपण महामंडळांचे पदाधिकारी नेमले. हे पदाधिकारी निवडणुकीत वेगळेच काम करतात. पक्षाच्या कामासाठी त्यांना वेळ नसतो. ज्यांच्याबद्दल अशा तक्रारी आहेत आणि स्वतःच्या गावाकडे, तालुक्यात जे लक्ष देऊ शकत नाहीत त्या पदाधिकाऱ्यांना महामंडळातून मोकळे करावे आणि सांगावे आधी गावाचे बघा. राज्याचे बघायला पुष्कळ माणसे आहेत. कुठल्या जाती, धर्म, पंथाचा आहे हे पाहून पक्षात पदे दिली जात नाहीत. दिली जाणारही नाहीत. खऱ्या ध्येयवादी व काम करणाऱ्या कार्यकर्त्यालाच पदे मिळतील, याबाबत खात्री बाळगा. लाचारी पत्करून, पाया पडून कुणाच्या पुढे पुढे करायची काहीही गरज नाही. वडीलधाऱ्यांचा मान ठेवा. आपले काम प्रामाणिकपणे करा. पक्षाने त्यांच्याकडील याद्या करण्याचे काम लवकर पूर्ण करून आमच्याकडे सोपविल्या तर ३१ मार्च, २०१० पर्यंत सर्व महामंडळांचे व समित्यांचे पदाधिकारी नेमले जातील. आता मी माझ्या 'वीज व पाणी-वास्तव आणि उपाय' या विषयाकडे वळतो.

विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष भरून काढायचा असल्यामुळे सिंचनाच्या विभागाला सगळ्यांनी झुकते माप दिले. राज्यपालांच्या अध्यादेशानुसार निधीचे वाटप आपण करीत असलो तरी आता यापुढील काळात उत्तर महाराष्ट्र कोकण किंवा पश्चिम महाराष्ट्र यांच्यापैकी कुणावरही अन्याय होणार नाही अशी भूमिका घेतली जाईल. मागील काही वर्षांत आपण मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर बॅरेजेस बांधली. त्याचा कितीतरी फायदा बीड, जालना, लातूर, परभणी, नांदेड यांना झाला आहे. आता बरेच कार्यकर्ते पत्र देतात की कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बॅरेजेसमध्ये रुपांतरीत करावा. येत्या जूनपर्यंत मराठवाड्यातील सर्व बॅरेजेस पूर्ण करायचे आहेत. 'अेआयबीपी'चा पैसा जलसंपदाचे महत्त्वाचे प्रकल्प मार्ग लावण्यासाठी दिलेला आहे. त्यामुळे अधिक गतीने कामे होतील. धरणांचे नियोजन योग्य तऱ्हेने करून शेततळ्यांचा फायदाही राज्याला मिळवून देण्याच्या दृष्टीने नियोजन चालू आहे. मोठ्या प्रमाणावर शेततळी होताहेत. पंतप्रधान पॅकेजमधून आलेल्या निधीतून अशी हजारो तळी करण्यात आली आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी वेगळी धरणे करा अशा सूचना आम्ही महानगरपालिकांना दिल्या आहेत. मराठवाडा व विदर्भाच्या काही भागात यावर्षी दुष्काळ आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. ती लक्षात घेऊन टँकर भरण्याकरिता पाणी राखून ठेवलेले आहे. जिथे ५० पैशांपैक्षा कमी आणेवारी आहे तिथे वीज तोडू नका असे सांगितले आहे. ५० पैशांपेक्षा जास्त आणेवारी आहे तिथे वीज बील भरले नाही तर कनेक्शन तोडले जाणार आहे. ८५०० कोटी रुपयांची सबसिडी देऊन राज्य सरकारने वीजबिलापोटी एवढी रक्कम भरली आहे. यंत्रमागालाही तीन हजार कोटी रुपयांची सबसिडी देऊन त्यांचेही बिल भरले आहे. शेतकऱ्यांना सरकारकडून खूप मदतीची अपेक्षा आहे. पण 'एमईआरसी'ची मान्यता असल्याशिवाय आता निर्णय घेता येत नाही. येत्या दोन वर्षांत म्हणजे २०१२ पर्यंत राज्याला वीजेत स्वयंपूर्ण करायचे आहे. यासाठी वेगाने प्रकल्प हाती घ्यावे लागतील. नियमात बदल करून तातडीने जागा व इतर गोष्टी द्याव्या लागतील. वीज देत असताना काही लोकांचा वाईटपणाही घ्यावा लागेल. प्रकल्पांना लोकांनी विरोध करू नये अशी माझी विनंती आहे.

सौरऊर्जेला आपण प्राधान्य देत असून या उर्जेकरिता प्रती मेगॅवॅट १६ ते १८ कोटी रु. खर्च येतो. केंद्र सरकार सौर उर्जेच्या एका युनिटकरिता १२ रुपये सबसिडी देणार असून आपण १७ रु. युनिटने ही वीज घेणार आहोत. सौर उर्जेची १ मेगॅवॅट वीज तयार करायला पाच एकर जागा लागते. या जागाही संबंधितांनी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

ग्लोबल वॉर्मिंगचे संकट भयानक आहे. प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे काही ठिकाणी सिंचनाचे पाणी नेता येणार नाही. आपली सिंचन क्षमता ४० टक्के आहे. परंतु आपण अजून वीस टक्क्यांपर्यंतही पोहोचू शकलेलो नाही. सिंचनाचा वेग वाढविण्यासाठी त्वरेने प्रकल्प पूर्ण करणे व या प्रकल्पांकरिता लोकांनी जागा देणे आवश्यक आहे. सौर ऊर्जेसाठी लागणाऱ्या चिप्स बनविणारा कारखाना पडीक, कोरडवाहू जमिनीवर काढायला काही हरकत नाही. त्यासाठी लोकांनी पुढे येऊन या पडीक जमिनी दिल्या पाहिजेच. १७०० मेगॅवॅट वीज तयार करणाऱ्या विंडमिल आज आपल्याकडे आहेत. पाच ते सहा कोटी रु. प्रती मेगॅवॅट वीज निर्मितीचा खर्च आहे.

साखर कारखान्यातील बगॅस (चिपाड) पासूनची वीज ४ रु. ७० पैसे युनिट या दराने खरेदी करण्यात येणार असून त्या दराची आता निश्चिती झाली आहे. आता सहकारी क्षेत्राबरोबरच खासगी कारखानदारही चांगल्या पद्धतीने बगॅस



पासून वीज तयार करण्यासाठी पुढे येऊ लागले आहेत. खासगी क्षेत्रातही वीज निर्मितीचे मोठे प्रकल्प हाती घेतले आहेत. दाभोळ प्रकल्पातून २००० मेगॅवॅट वीज मार्च २०१० च्या अखेरीस मिळू लागेल. या प्रकल्पासाठी लागणारा अतिरिक्त गॅस देण्याचे केंद्राने मान्य केले आहे.

नव्याने निर्माण होणारी वीज वाहून नेण्यासाठी मोठे मोठे टॉवर्स उभे करावे लागणार आहेत. गेल्या ५० वर्षांत वीजेच्या क्षेत्रात राज्यात जेवढे काम झाले होते तेवढे इन्फ्रास्ट्रक्चरचे काम दोन-तीन वर्षात आपण करून वीज खरेदीचे २५ वर्षांपर्यंतचे करार केले आहेत. पाच हजार मेगॅवॅट वीज खरेदीचे नियोजन आम्ही केलेले असून २०१२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीच्या आधी वीजेच्या बाबतीत महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करायचे आहे. २०१२ पासून २५ वर्षांकरिता दोन हजार मेगॅवॅट व २६ वर्षांकरिता २५०० मेगॅवॅट वीज खरेदीचा करार केला आहे. २६०० मेगॅवॅट वीज ३ रु. ४२ पैसे या दराने खरेदी करण्यात येणार आहे. तसा करार झालेला आहे. काही लोक व स्वयंसेवी संस्था या प्रकल्पांना विरोध करीत असल्यामुळे वीज निर्मितीत अडचणी येत आहेत. काही प्रकल्पात आपण खूप पुढे गेलो आहोत. त्यात कोणतीही आडकाठी येऊ देता कामा नये.

बारा हजार मेगॅवॅट वीज अणूपासून निर्माण करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत. या प्रकल्पांपासून प्रदूषण होईल





असा अपप्रचार व गैरसमज पसरविण्याचे काम काही लोकांनी चालविले आहे. तथापि जगात जिथे असे प्रकल्प आहेत तिथली माहिती घेतली असता कोणतेही प्रदूषण या प्रकल्पांमुळे होत नाही असे लोकांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

वीजेचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यासाठी तसेच लाईन्स व ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी ज्या जमिनी ताब्यात घ्याव्या लागतात त्यांना बाजार भावाप्रमाणे किंमत दिली जात आहे. दूधात भेसळ करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा करण्याचा निर्णय घेतला. सरकारने हा कायदा केल्यापासून दुधाचे राज्यात शॉर्टेज निर्माण झाले आहे. दुधात भेसळ झाली आणि तिथे पोलिसांनी किंवा कुणी बघ्याची भूमिका घेतली तर ते सहन केले जाणार नाही असा कडक इशारा गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी दिला. त्यामुळे दुधातली भेसळ कमी झाली आहे. असाच कायदा आता ट्रान्सफॉर्मर व वीजेचे साहित्य चोरून नेणाऱ्यांना लावण्याचा विचार आहे. जे कुणी या साहित्याची चोरी करतील त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात यावी अशी तरतूद असणारा कायदा करण्यात यावा म्हणून माझ्या विभागातर्फे तसा प्रस्ताव मी मंत्रिमंडळापुढे नेणार आहे. चंद्रपूरमध्ये काही प्रकल्प मे महिन्यात पाणीसाठा कमी असल्याने बंद पडण्याची शक्यता आहे. सरकार वीज, पाणी या अत्यावश्यक गोष्टी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. जनतेचेही त्यासाठी सहकार्य हवे.



# पिण्याच्या पाण्याचे आवश्यक तेवढेच आरक्षण

**या राज्यस्तरीय शिबिरात श्री. अजित पवार यांच्या भाषणाची छापील पुस्तिकाही सर्वांना वितरित करण्यात आली. या पुस्तिकेतील मजकुरही येथे पुनमुर्द्रित करीत आहोत.**

माझ्या राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनो,

नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर औरंगाबाद शहरामध्ये आपल्या पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशन होत आहे. या अधिवेशनासाठी आलेल्या आपल्या सर्वांचे मी हार्दिक स्वागत करतो.

राष्ट्रवादी पक्ष हा संवेदनशील स्वाभिमानी कार्यकर्त्यांचा, लोकांचा परिवार आहे. या परिवाराचा घटक असल्याचा आणि राष्ट्रवादी पक्षाचा कार्यकर्ता असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. कारण ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा मोलाचा संदेश देणाऱ्या पवारसाहेबांचा हा पक्ष आहे. मित्रहो, राजकारण हे नेहमी तात्कालिक असतं तर समाजकारण हे अखंडपणे चालणारे असतं. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमधून आपल्या पक्षाला काँग्रेसच्या साथीने तिसऱ्यांदा सत्ता देण्याचा निर्णय महाराष्ट्रातील जनतेने घेतलेला आहे. हा समाजकारणावर आपण लक्ष केंद्रीत केल्याचा परिपाक आहे. आता आपल्या राज्यात विधानसभेच्या किंवा लोकसभेच्या निवडणुका लवकर नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना आणखी दोन-तीन वर्षांचा कालावधी आहे. या कालावधीचा उपयोग आपल्याला पक्ष बांधणीकरिता, समाजाच्या विकासाच्या कामाकरिता, निःस्वार्थीपणे, संघटीतपणे काम करण्याकरिता व्यतीत करावयाचा आहे. एक गोष्ट मात्र मला निश्चितपणे सांगाविशी वाटते की, लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. म्हणूनच आता हाती असलेल्या वेळेमध्ये आपल्या पक्षाने व नेत्यांनी जे काम केलेले आहे ते लोकांसमोर व घरोघरी पोहोचविण्याचे काम तुम्हा-आम्हा सर्व कार्यकर्त्यांना जोमाने करावयाचे आहे.

मित्रांनो, नव्या सरकारमध्ये जलसंपदा व ऊर्जा या प्रमुख खात्यांची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आलेली आहे. पाणी आणि ऊर्जा हे दोन घटक मानवी विकासासाठी आवश्यक आहेत. या दोन्ही घटकांचा नियोजनपूर्वक वापर करून राज्याच्या प्रगतीला एक निश्चित दिशा देण्याची जबाबदारी आज माझ्यावर पक्षाने सोपविलेली आहे. त्याच अनुषंगाने आज 'वीज आणि पाणी- वास्तव आणि उपाय' या विषयावर बोलण्याबाबत मला सांगण्यात आले आहे.

मित्रहो, राज्यातील विजेचे भारनियमन हा आम्हा सर्वांसाठी चिंतेचा विषय होता व आजही आहे. देशाच्या पातळीवर बिकट असलेल्या या प्रश्नाबाबत महाराष्ट्रात



अलीकडच्या ५ वर्षांत अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू झालेले आहे. यात केवळ विद्युत निर्मितीची क्षमता वाढविणे एवढाच कार्यक्रम नाही, तर त्याला पूरक असणारा आणि तेवढाच महत्त्वाचा वितरण व पारेषणाच्या क्षेत्रातही आमुलाग्र परिवर्तन घडवून आणणारा हजारो कोटींच्या गुंतवणुकीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. ६ जून २००५ रोजी राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना होऊन अस्तित्वात आलेल्या महानिर्मिती, महावितरण व महापारेषण या कंपन्या अतिशय जोमाने कामास लागल्या आहेत. २०१२ पर्यंत महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रात यामळे आमूलाग्र बदल होणार असून राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल, असे चित्र निर्माण झाले आहे.

गेल्या १० वर्षांत एकही युनिट वीज निर्माण झाली नाही असे काहीजण सर्रास म्हणत असले तरी रत्नागिरी गॅस प्रकल्पाची ३०० ते ६०० मे. वॉ., याशिवाय परळी, पारस येथे एकूण ५०० मे.वॉ. वीजनिर्मिती गेल्या वर्ष-दोन वर्षांपासून सुरू आहे. याच नियोजाचा भाग म्हणून परळी २५० मे.वॉ. (२ बाय ५०० मे.वॉ.), चंद्रपूर १००० मे. वॉ. (२ बाय ५०० मे.वॉ.) अशा सुमारे ३००० मे.वॉ. च्या प्रकल्पांची कामे जोमाने सुरू आहेत. हे संच यावर्षी जुलैपासून टप्प्या टप्प्याने कार्यान्वित व्हायला सुरुवात होऊन २०१२ पर्यंत हे सर्व संच कार्यान्वित होतील.

याशिवाय परळी, भुसावळ व पारस येथील सध्या अस्तित्वात असलेले लहान क्षमतेचे संच बदलून त्यांच्या जागी मोठ्या क्षमतेचे संच आपण बसवित आहोत. यातून सुमारे ६०० मे. वॉ. एवढी जास्तीची वीज उपलब्ध होणार आहे. ही क्षमताही २०११-१२ पर्यंत उपलब्ध होणार आहे. एवढ्यावरच महानिर्मिती कंपनी थांबलेली नाही तर कोराडी येथेही ६६० मे.वॉ.चे ३ संच उभारले जाणार आहेत. हे संच अद्ययावत अशा सुपर क्रिटीकल तंत्रज्ञानाचे असणार आहेत. गॅसचा प्रश्न सुटल्यास (रिलायन्सच्या काकीनाडा प्रकल्पामुळे ही शक्यता आता जास्त वाढली आहे) उरण येथे १२२० मे.वॉ. चा विस्तार प्रकल्प उभारण्याची महानिर्मितीची योजना आहे. ४५०० कोटींच्या या प्रकल्पास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. यासाठी जमीन व पाणी उपलब्ध असून पर्यावरणाचीही मंजुरी मिळालेली आहे.

यावरून असे दिसते की गेल्या ५०-६० वर्षांत आपण औष्णिक विद्युत निर्मितीची जेवढी क्षमता निर्माण केली तेवढी क्षमता केवळ ४-५ वर्षांच्या कालावधीत निर्माण केली जाणार आहे. या औष्णिक वीज निर्मिती केंद्रांना दिर्घकालीन चांगल्या दर्जाच्या कोळशाची उपलब्धता व्हावी यासाठी आमची महानिर्मिती कंपनी युद्धपातळीवर कार्यरत आहे.

याशिवाय वीजनिर्मिती क्षेत्रामध्ये खासगी कंपन्यांचे प्रकल्पदेखील प्रगतीपथावर आहेत. विजेची उपलब्धता मागणीपेक्षा थोडी अधिकच रहावी असा शासनाचा प्रयत्न असून त्यासाठी खासगी वीज उत्पादकांसमवेत स्पर्धात्मक निविदेद्वारे भविष्यकालीन वीज खरदीचे करार आपण करीत आहोत.

केंद्र शासनाच्या वीज प्रकल्पांमध्ये राज्याचा वाटा वाढवून मिळविण्यास आपण यशस्वी झालो असून सन २०१२ अखेर पर्यंत सुमारे १५०० मेगावॅट एवढी वीज राज्यास टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहे.


परळी औष्णिक विद्युत केंद्र

निर्माण होणारी अतिरिक्त वीज वाहून नेण्यास सक्षम यंत्रणा उभारण्यासाठी महावितरण, महापारेषण कंपन्यांनी पायाभूत सुविधा निर्मितीचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. महावितरण कंपनीने सुमारे ९००० कोटी रुपयांचा कार्यक्रम हाती घेतला असून त्याअंतर्गत ५६५ नवीन उपकेंद्र तर ७२,३६० नवीन वितरण रोहित्रे यासह उच्चदाब वाहिन्या टाकण्यात येणार आहेत.

महापारेषण कंपनीकडून २० हजार कोटी रुपयांचा पायाभूत सुविधा उभारणीचा



*पारस औष्णिक विद्युत केंद्र*

कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्याअंतर्गत अतिउच्च दाबाची १२६ उपकेंद्रे उभारण्यात येत आहेत. तसेच रोहित्रांची क्षमता येत्या ५ वर्षांत ५३८८७ एमव्हीए एवढी उभारली जाणार आहे.

मित्रहो, सध्या आपल्या राज्यामध्ये वीजेची मागणी सुमारे १५ हजार मे.वॉ. असून सर्व स्त्रोतांकडूनची विजेची उपलब्धता सुमारे १० हजार, ५०० ते ११ हजार मे.वॉ. आहे. यामुळे सध्या राज्यात सुमारे ४ ते ४ हजार, ५०० मे.वॉ. विजेचे भारनियमन करण्यात येते. विजेच्या भारनियमनाचा हा प्रश्न २०१२ पर्यंत कायमचा निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत असतानाच टप्प्याटप्प्याने ग्राहकांना दिला देण्याचे जाणीवपूर्वक व नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी उपलब्ध वीज व मागणीचे भार व्यवस्थापन करून भारनियमन आटोक्यात ठेवण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत अनेक योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण भागातील गावठाणामध्ये सिंगल फेजींग योजना व स्वतंत्र गावठाण फिडर योजना या त्यातील मुख्य योजना आहेत. याअंतर्गत रुपये ३२३३ कोटी एवढा खर्च करण्यात येत असून राज्यातील ४१०९५ गावांपैकी ३०३२४ गावात ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची परिणती म्हणून कृषी प्रवण भागातील गावठाणातून भारनियमन कमी होत आहे.

ग्रामीण भागामध्ये वीजेच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत २००१ च्या जनगणनेनुसार बी.पी.एल. व्यक्तींना १५ रुपयांत वीज जोडणी व एक बल्ब उपलब्ध करून देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील आपल्या माहितीतील कोणीही बी.पी.एल. व्यक्ती या योजनेपासून वंचित राहणार नाही याची आपण सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे.

शेतकरी बांधवांच्या कृषीपंपासाठी कमीतकमी दर आकारण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यानुसार ३ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतकऱ्यांना प्रती अश्वशक्ती वार्षिक ५०० रुपये, ३ अश्वशक्ती ते ५ अश्वशक्तीपर्यंतच्या शेतकऱ्यांना ७०० रुपये आणि ५ अश्वशक्तीपेक्षा जास्त जोडभार असलेल्या शेतकऱ्यांना ९०० रुपये असे सवलतीचे दर लागू करण्यात आले आहेत. सबसिडीखातर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने भांडुप, पुणे, नाशिक भागांतील कृषीपंपासाठी २१६० रुपये प्रती अश्वशक्ती प्रति वर्ष आणि उर्वरित भागासाठी १८०० रुपये असे दर ठरविले होते. परंतु शासनाने शेतकऱ्यांवरील ओझे कमी करण्यासाठी या संदर्भात मोठ्या प्रमाणावर सबसिडी देण्याचे धोरण स्वीकारले. त्यानुसार ३ अश्वशक्तीपर्यंतच्या शेतकऱ्यांना प्रती अश्वशक्ती वार्षिक ५०० रुपये, ३ अश्वशक्ती ते ५ अ.श.पर्यंतच्या शेतकऱ्यांना ७०० रुपये आणि ५ अ.श. पेक्षा जास्त जोडभार असलेल्या शेतकऱ्यांना ९०० रुपये असे सवलतीचे दर लागू करण्यात आले. उरलेली करोडो रुपयांची रक्कम सबसिडी म्हणून शासन शेतकरी बांधवांच्यावतीने महावितरणला दरवर्षी देत आहे. यंत्रमागधारकांनाही याचप्रमाणे वीज बिलात सवलत दिली जाते. २७



*भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र*

अश्वशक्तीवरील यंत्रमागधारकांना ५० टक्के तर त्यावरील अश्वशक्तीसाठी ६६.५ टक्के सवलत वीजबिलात दिली जाते.

महाराष्ट्र शासनाने शेतकरी बांधवांच्या २०००-०१ पासून २००८-०९ पर्यंत वीजबिल सवलतीपोटी सुमारे ८५०० कोटी एवढ्या रक्कमेचा तर यंत्रमागधारकांच्या सवलतीपोटी ३००० कोटी आर्थिक भार स्वतः उचलला आहे.

राज्यातील दुष्काळी/टंचाई परिस्थिती लक्षात घेऊन टंचाईग्रस्त भागातील कृषी पंप वीज बिलात सबसिडीची रक्कम कापून जे बील प्रत्यक्षात भरावे लागते त्याच्यातही १/३ एवढी सवलत शासनाने नुकतीच दिली आहे. तसेच या भागातील कृषीपंप धारक शेतकऱ्यांचे थकबाकीपोटी वीज कनेक्शन न कापण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शेतकरी बांधवांना कृषी पंपासाठी लवकरात लवकर वीज जोडण्या देण्याचे ठरविण्यात आले आहे. अर्ज केलेल्या तथापि प्रलंबित असलेल्या सर्व वीज जोडण्या मे. २०१० अखेर पर्यंत देण्यात येतील.

वीज निर्मितीचे ठोस प्रयत्न, वाढीव वीज वाहून नेण्यास सक्षम वितरण यंत्रणेची उभारणी यातून निश्चितच राज्य २०१२ अखेरपर्यंत वीजेच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होईल अशी मला खात्री आहे. महानिर्मितीचे वीज प्रकल्प जसेजसे कार्यान्वित होतील तसेतसे त्या प्रमाणात राज्यातील जनतेला २०१२ च्या आधीही भारनियमनातून दिलासा देण्याचा माझा निश्चितच प्रयत्न राहील. आपणा सर्वांच्या सहकार्याने महाराष्ट्र विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल व पुनश्च वीजनिर्मिती क्षेत्रात अग्रेसर स्थान प्राप्त करेल, याची ठाम खात्री मी तुम्हाला आज निश्चितपणे देतो.

**आता पाणीप्रश्नाकडे वळूया.**

मला या ठिकाणी आवर्जुन सांगावयाचे आहे की, स्वातंत्र्योत्तर काळात पाटबंधारे नाव मिळालेल्या आणि सध्या जलसंपदा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या विभागाचे काम केवळ सिंचनापुरते मर्यादित नाही. पिण्यासाठी पाणी, शेतीसाठी पाणी, उद्योग, मत्स्य व्यवसाय अशा विविध स्वरुपात सध्या पाणी वाटपाच्या नियोजनाची जबाबदारी जलसंपदा विभाग करीत आहे. जलनीतीनुसार प्राधान्यक्रम ठरविताना पिण्याचे पाणी प्रथम क्रमांकावर असून दुसऱ्या क्रमांकावर औद्योगिक पाणी, शेतीसाठी पाणी असा क्रम आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक तेवढे आरक्षण ठेवून उर्वरित पाण्याचे उपलब्धता विचारात घेऊन सिंचनासाठी तथा अन्य उपयोगासाठी ते पाणी वापरण्याची आवश्यक काळजी घेण्याच्या सूचना महसूल यंत्रणेला शासनाने दिलेल्या आहेत.

महाराष्ट्राची पाण्याची गरज जास्त आहे. पाण्याचे नैसर्गिक वाटप विषम आहे. राज्यात कोकणात अति पाऊस पडतो, तर विदर्भात कमी, म्हणजेच संपूर्ण राज्यात समप्रमाणात पाऊस पडत नाही. अगदी यंदाची धरणातील पाणीसाठ्याची आकडेवारी पहायची म्हटली तर ती अशी आहे.

| प्रदेश | प्रकल्पांची संख्या | प्रकल्पीय साठा (दलघमी) | दि.१/२/२०१० चा पाणीसाठा (दलघमी) | टक्केवारी | मागील वर्षी १/२/०९ रोजीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| कोकण | १४५ | १०८५ | ६६३ | ६१ | ५३ |
| मराठवाडा | ५६३ | ६५२२ | ११५३ | १८ | ३९ |
| नागपूर | ३६३ | ३४७८ | १०५५ | ३० | १४ |
| अमरावती | ३५५ | २८७६ | ७८४ | २७ | ८४ |
| नाशिक | ३१९ | ३७७२ | २१९६ | ५८ | ५८ |
| पुणे | ५४१ | १००६२ | ७५७८ | ७५ | ८४ |
| एकूण | २२८० | २७७९५ | १३४२९ | ४८ | ५४ |
| इतर धरणे | १४ | ५८०५ | ३८८९ | ६७ | ७३ |
| एकूण राज्यातील | २३०० | ३३६०० | १७३१८ | ५२ | ५७ |

(मागील वर्षांच्या तुलनेने मराठवाडा प्रदेशात २१ टक्के व पुणे प्रदेशात ९ टक्के पाणीसाठा कमी आहे.)

अशा परिस्थितीत आपल्या गरजांचे नियोजन करून पाणी समस्या सोडविणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून आम्ही सातत्याने कार्यरत आहोत. विदर्भ, कृष्णा खोरे, कोकण, गोदावरी-मराठवाडा व तापी या पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्याच्या विविध भागामध्ये सिंचन व्यवस्थापनाची कामे आम्ही हाती घेतलेली आहेत.

राज्यात सद्यस्थितीत एकूण सुमारे रुपये ५४००० कोटी उर्वरित किमतीचे व ३६.२६ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता असलेल्या १०५१ प्रकल्पांची कामे सुरू आहेत. सन




२००९-१० मध्ये या प्रकल्पासाठी सुमारे रुपये ७५७८ कोटींचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. सिंचनाचे महत्त्व ओळखून पुढील पाच वर्षांत दरवर्षी किमान रुपये ८००० कोटीचा निधी उपलब्ध करून एकूण १० ते १५ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता येत्या पाच वर्षांत निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. सिंचनाच्या विकासात सर्व प्रदेशामध्ये समतोल साधण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत.

सिंचन व्यवस्थापनात लोक सहभाग वाढविण्याचे शासनाचे धोरण आहे. शासनाने महात्मा फुले पाणीवापर संस्था अभियान व त्याअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पाणीवापर संस्था पुरस्कार जाहीर केला आहे. माजी मुख्यमंत्री कै. श्री. शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतीदिनी म्हणजे दि. २६ फेब्रुवारी रोजी प्रादेशिक स्तरावर २ बक्षिसे आणि राज्य स्तरावर ३ बक्षिसे दरवर्षी देण्यात येणार आहेत. त्यातून लोक सहभाग वाढून सिंचन व्यवस्थापन अधिक कार्यक्षम रितीने राबविणे शक्य होईल. येत्या पाच वर्षांत त्यातून सुमारे १० लक्ष हेक्टर क्षेत्र लाभदायक शेतकऱ्यांना हस्तांतरीत करण्याचा शासनाचा मनोदय आहे. राज्यातील मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात शेतचाऱ्या, शेतचर व बांधकामे इ. कामे लाभक्षेत्र विकासांतर्गत केंद्र शासनाच्या मदतीने करण्यात येत आहे. दरवर्षी ३०००० हेक्टर वरील प्रक्षेत्र कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट विभागाने आपल्यासमोर ठेवलेले आहे. याशिवाय सिंचनाचा अनुशेष १९९४ पासून आपण परिगणीत करून त्यादृष्टीने पावले टाकत आहोत. २०१० सालापर्यंत जो आर्थिक अनुशेष आहेतो पूर्णपणे करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत.

अशी सर्व परिस्थिती असली तरी आजपर्यंत राज्यामध्ये २० टक्के सिंचन क्षेत्र आपण निर्माण करू शकलो आहोत. देशपातळीवरचा विचार करता आपल्या देशामध्ये ४३ टक्के एवढे सिंचनाचे क्षेत्र आहे. देशाच्या सिंचन क्षेत्राची ही टक्केवारी पाहता महाराष्ट्र राज्याचे हे सिंचन क्षेत्र केवळ २० टक्केच आहे. म्हणजे ८० टक्के भाग सिंचनाशिवाय आहे. तिथे जी पाण्याची व्यवस्था आहे ती पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहे. जिथं पाऊस जास्त आहे जसे की कोकणामध्ये पाणी साठवण्याच्या काही अडचणी आहेत तर काही ठिकाणी मुळात पाऊसच अत्यल्प आहे त्यामुळे संपूर्ण धरणे भरल्यावर पाणी टंचाईची तीव्रता कमी होण्यास मदत होऊ शकते. परंतु पूर्णपणे धरणातून हा प्रश्न सुटू शकत नाही. म्हणूनच स्थानिक पातळीवरच्या पाणी व्यवस्थापनाच्या सर्व उपाययोजना राबविल्या गेल्या पाहिजेत. त्यातच हवामानात होत असलेले बदल, पावसाची अनियमितता, जागतिक तापमानवाढीचा प्रश्न इत्यादीही अनेक समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबी विचारात घेऊनच जलसंधारण व पाणलोटक्षेत्र

विकासांच्या कामावर लक्ष दिले पाहिजे. याच कामासाठी केंद्र शासनाच्या रोजगार हमी योजनेमार्फत मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध होऊ शकतो. तो पैसा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने देखील योग्य ते नियोजन केले पाहिजे. पाण्याचा थेंब न थेंब कसा उपयोगात येईल हे आपण सर्वांनी पाहिले पाहिजे. तुमच्यापैकी प्रत्येकाने आपापल्या भागात गेल्यानंतर पाणी व्यवस्थापनाचा यथाशक्ती प्रचार केला पाहिजे.

माझे अनेक सहकारी मित्र मंत्रिमंडळामध्ये असून विविध खात्याची जबाबदारी उत्तमपणे पार पाडीत आहेत. अनेक विकासाची कामे आपल्या सरकारकडून सुरू आहेत. मात्र मित्रांनो, आज सर्वकाही आलबेल आहे असं मी मानत नाही. आपल्याला अजूनही खूप काम करायचं आहे. दहशतवाद, धर्मांधता, जातीयवाद, महिला, दलित व कमकुवत घटकांवरील अत्याचार, प्रांतिकवाद, सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न, वाढता भ्रष्टाचार यासारख्या अनेक समस्यांवर आज शासनाच्या मर्यादा काही प्रमाणात का होईना स्पष्ट झालेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी केवळ पैसा ओतून चालणार नाही. या समस्येच्या मूळावरच घाव घातले पाहिजे. अर्थात त्यासाठी आपल्याला सर्व जनतेचा सहभाग व सहकार्य घ्यावे लागेल. लोकसहभागाशिवाय सर्वंकष प्रगती शक्य नाही. या तत्त्वाची सुरुवात राष्ट्रवादी पक्षानेच केली.



*विदर्भ व मराठवाड्यात नदीवर बांधलेल्या बॅरेजेसच्या साखळीमुळे शेतकऱ्यांची सिंचनाची मोठी सोय झाली आहे.*

ग्रामीण व शहरी स्वच्छता असो, पाणीपुरवठा योजना असो वा गावागावातील तंटा मिटवण्याचा विषय असो, विविध योजनेतून लोकसहभाग घेतला तर मिळणारे यश हे निर्भेळ आणि परिपूर्ण असते, चिरकालीन टिकणारे असते. हाच वसा आपल्याला यापुढेही जपायचा आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन राज्य व राष्ट्रहितासाठी संकुचित स्वार्थ बाजूला ठेवला तर महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वसंपन्न राज्य बनण्याची कुवत आहे. संपन्न, समृद्ध महाराष्ट्र राज्यासाठी पुन्हा एकदा तयारीला लागा. आपआपसातील मतभेद विसरा, कात टाका, विकासप्रक्रियेत सक्रिय सहभागी व्हा! आजच्या या मेळाव्यासारखे महिला व युवकांचे मेळावे, शिबिरे, अधिवेशने आयोजित करण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. अशा मेळाव्यातून, शिबिरांमधून कार्यकर्ता घडविण्याचे काम होत असते आणि हेच कार्यकर्ते गावोगावी जाऊन विकास कामाचा मंत्र अर्थात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारधारा लोकांसमोर घेऊन जात असतात.

आजच्या या अधिवेशनाच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, राज्यातील जलसंपदा आणि ऊर्जा या दोन प्रमुख विभागांची जबाबदारी पक्षाने माझ्यावर टाकलेली आहे. ती समर्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न मी निश्चितपणे करीन. यासाठी पक्षातील सर्व लहानथोर कार्यकर्ते, नेते, पदाधिकारी व मंत्री मला योग्य ते सहकार्य करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपल्या सर्वांना हे नवीन वर्ष सुखसमृद्धीचे, भरभराटीचे जाईल अशा शुभेच्छा देऊन माझे भाषण संपवतो.

■■■

# निवडणुका स्वबळावर लढवायच्या

## आर. आर. पाटील, (गृहमंत्री)



लोकसभा व विधानसभा निवडणूकीत आपल्या पक्षाला अपेक्षेइतके यश मिळाले नाही ही गोष्ट सर्वांनाच कबूल करावी लागेल. जे काही यश आपल्याला मिळाले ते निश्चितच नाव घेण्याजोगे नाही. वाटचालीत रस्त्यावरून जाताना जे चढ-उतार येतात तसे पक्षालाही चढ-उतार अनुभवावे लागतात. कारणे अनेक असतात. एका गोष्टीबाबत कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. लोकसभेचे निकाल अनपेक्षित लागल्यानंतर एकही कार्यकर्ता नाऊमेद झाला नव्हता. उलट लोकसभा निवडणुकीत जे नुकसान झाले ते विधानसभा निवडणुकीत भरूनच काढू या ईर्षेने तो उभा राहिला. त्यामुळे आपला पक्ष पुन्हा सत्तेत विराजमान होऊ शकला.

आज केवळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासमोरच आव्हाने आहेत असे नाही तर लोकशाही समोरच काही जबरदस्त आव्हाने उभी राहिली आहेत. निवडणुकीसाठी इतके मोठे खर्च यापूर्वी कधी होत होते का ? आता खर्च आपण करायचा नाही म्हटले तरी समोरचा उमेदवार जे काही करतो त्याच्या काही प्रमाणात तरी खर्च आपण केला पाहिजे ना असा आग्रह धरून सगळेच उमेदवार प्रचंड पैसा निवडणुकीवर खर्च करताहेत. निवडणुकीत पूर्वी जात, धर्म हा कधीतरी महत्वपूर्ण फॅक्टर होता का? चारित्र्य, समाजकारण, राजकारण बघून उमेदवाऱ्या देत होते. आज या गोष्टी गौण ठरताहेत. ज्या महाराष्ट्राने देशाच्या समाजप्रबोधनाला दिशा देण्याचे काम केले त्याच महाराष्ट्रात रोज धर्म, जातीजातींत दरी वाढविण्याचे काम ज्या शक्ती उभ्या करताहेत त्यांच्या विरुद्ध पहिला लढा आपल्याला उभारावा लागेल. लोकही प्रवाह पतीत होताना दिसताहेत. सगळीकडे अंधाधुंद आहे मग आपण हात धुवून घ्यायला काय हरकत आहे असाही विचार काही नतदृष्ट लोक करताहेत. सगळेच पक्ष प्रवाह पतीत होत असतांना आपण आपला एक वेगळा ठसा पक्षाचा उमटविला पाहिजे. आपल्या पक्षात घराणे महत्वाचे नाही. जात-धर्म विचारला जात नाही. दोषांच्या विरुद्ध लढण्याचा व समाजातील तेढ कमी करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न आपण केला पाहिजे.

भाषिक वादावरून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न जाणिवपूर्वक केला जात आहे. मराठी भाषिकांचा पुळका घेऊन काही लोक रोज अश्रू ढाळताहेत. महाराष्ट्रात भाजप सेनेचे राज्य होते. पाच वर्षे त्यांनी मनमानी कारभार केला. मराठी भाषिकांच्या हिताचा कोणाता निर्णय त्यांनी त्यावेळी घेतला? खूप मराठी भाषिक गरीब आहेत. त्यांच्या हिताचा काय निर्णय घेतला? संजय निरुपम म्हणाले की 'जन्माने महाराष्ट्रीयनच असले पाहिजे आणि केवळ १५ वर्षांची वास्तव्याची अट नको. महाराष्ट्रात कोणी काही बोलले की तिकडे बिहार-उत्तर प्रदेशात लगेचच रिॲक्शन देण्यासाठी चढाओढ लागते. हिंदी भाषिकांचा मक्ता जणू काही लालू प्रसाद आणि नितीश कुमार यांनाच दिला आहे ! सौहार्दाचे वातावरण दूर केले जाऊन भाषिका-भाषिकांत जुंपून दिले जात आहे. हे प्रयत्न हाणून पाडायला दुदैवाने कुणीच पुढे येत

नाही. ही मोठी शोकांतिका आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यात लोकांना का जावे लागते? तर केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी. ज्याचे जिथे पोट भरते तिथे तो समाधानाने राहण्याचा प्रयत्न करतो. मराठी भाषिकांच्या हिताचे आपण काय केले ? याचे उत्तर मराठीचा पुळका असणाऱ्यांनी दिला पाहिजे. आज ना उद्या या बाबतीत आपल्या पक्षाला पुढाकार घ्यावा लागेल. व्यापक स्वरुपात लोकांपुढे या भूमिका न्याव्या लागतील. लोकशाहीपुढे जे प्रश्न आहेत ते दिवसेंदिवस गंभीर बनत चालले आहेत. त्यांचा मुकाबला समर्थपणे व व्यापक अशी वैचारिक भूमिका घेऊन करावा लागेल. फार ताकतवान कार्यकर्ते आपल्या पक्षात काम करताहेत. पण बाहेरून एक ग्रुप येतो. लगेचच युतीची भाषा सुरू करतो. युती ही एका बाजूने कधीच होत नाही. भविष्यातही अशा गोष्टी वारंवार येतील. कोणत्याही निवडणुका लढतांना आपल्याला त्या स्वबळावर लढवायच्या आहेत या पद्धतीने कार्यकर्त्यांनी कामाला लागले पाहिजे. बोटचेपेपणाने निवडणुकांकडे न बघता एकत्रित येऊन व संघटीतपणे आपण लढलो तर आपल्याला हरवायची ताकद कोणातच नाही. काही ठिकाणी गटबाजीने आपण जेवढे नुकसान करतो आहे तेवढे विरोधकही करत नाहीत.

सगळ्यांना आपण पद देऊ शकत नाही. पण सन्मानाची वागणूक मात्र आपण देऊ शकतो. पक्षाची खरी ताकद हे कार्यकर्ते असतात. नेत्यांमुळे पक्ष चालत नाहीत. लाखोंच्या संख्येने कार्यकर्ते आपल्या जवळ असले तरीही आपल्या राष्ट्रवादीची दुय्यम भूमिका का राहिली? विरोधकांबरोबर लढण्याअगोदर आपण मनाने एकत्र होऊया. अन्यायच होत असेल पक्षात कोणावर तर तो मोकळेपणाने समोर मांडूया. पण गटबाजी कमी करूया. आपण केलेले काम कधीही वाया जाणार नाही. कर्तृत्वाला संधी निश्चित दिली जाईल. समन्वयाची भूमिका जिल्ह्यात पार पाडून नवीन कार्यकर्त्यांना बरोबर नेण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. तालुका स्तरावर सर्व लोक एकत्र येताहेत असे चित्र काही दिसत नाही. त्यामुळे अजून तालुकेसुद्धा सगळीकडे सक्षम नाहीत. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतरही काही लोक मत बदलायला तयार नाहीत.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सगळ्यांचा आहे. तो कोणा एका जातीधर्माचा नाही. तो संदेश खालपर्यंत कामातून जाईल असे पाहिले पाहिजे. आजही प्रसिद्धी माध्यमे ज्यांचे प्रश्न उचलतात त्यांना महत्व येते. पण ज्यांचे प्रश्न कोणी मांडतच नाही ते वाट पाहताहेत. अशा वाट पाहणाऱ्या घटकांपर्यंत, लोकांपर्यंत आपले कार्यकर्ते जाऊन पोहोचले पाहिजेत. नुकताच मी गडचिरोली जिल्ह्यात जाऊन आलो. मी स्वतःहून त्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मागून घेतले. गडचिरोली जिल्ह्यातील ५२ गावांचा वीजपुरवठा गेल्या १० वर्षांपासून खंडीत आहे. पण त्यासंबंधीचे एकही निवेदन मंत्र्याला तर सोडाच पण कार्यकर्ते किंवा अधिकाऱ्याला कुणीही दिलेले नाही. दारिद्र्य रेषेखालील लोकांची

आठवण फक्त निवडणूकीच्या वेळीच करायची हे चित्र बरोबर नाही. भविष्यकाळात आपला कार्यकर्ता लोकांचा मदतनीस झाला पाहिजे. लाखो लोकांपर्यंत कार्यकर्ते पोहचू शकतात. ज्या घटकापर्यंत आजवर कोणी पोहोचलेलेच नाही त्याच्यापर्यंत आपले कार्यकर्ते जाऊन पोहोचले तर एक नवा उपेक्षित वर्ग आपल्याला मिळू शकतो. स्थानिक प्रश्न वेगवेगळे आहेत. निम्मे सरकार आपले आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांची कामे आम्ही करत असतो. सरकार स्तरावरही काही कामे प्राधान्याने होणे गरजेचे आहे. व्यक्तिगत कामांकडे जेवढे लक्ष पुरवितो तेवढे विकासकामांकडे देत नाही ही खंत आहे. आपण या प्रस्थापितांची कामे करण्यापेक्षा उपेक्षितांची कामे करीत गेलो तर राष्ट्रवादीचे उद्याचे भवितव्य उज्ज्वल असू शकते. प्रदीर्घ काळ भाजप सेना युती करुन निवडणूका लढताहेत. मनसेच्या माध्यमातून एक गट बाहेर गेलाय. युतीतून तरुण वर्ग बाहेर पडलाय. शिवसेना भाजप यांच्या भाषेवरूनच्या भूमिकांवरून ते एक राहतील असे वाटत नाही. त्यांचे काय व्हायचे ते होवो पण आपल्या नेत्याची सगळ्यांना भिती वाटते आहे. त्यामुळे पवार साहेबांवर टीका करण्यासाठी सगळेजण तुटून पडताहेत. विरोधक तर सोडतच नाहीत पण आपले मित्र पक्ष देखील आडपडद्याने का होईना टीका करणे चालूच ठेवताहेत. लुंगी-सुंगी माणसे उठताहेत आणि आमच्या नेत्यावर टीका करताहेत.

जे दोष असतील त्यावर जरुर टीका करावी. यावर्षी देशातील ३३४ जिल्ह्यांत दुष्काळी स्थिती आहे तरीही विक्रमी उत्पादन होईल अशी आशा आहे. त्याचे कौतुक होण्याऐवजी टीका-टिप्पणी चालू आहे. हे विक्रमी उत्पादन कशामुळे होत आहे? अन्नधान्याच्या आधारभूत किंमती जाणिवपूर्वक वाढवून दिल्या म्हणून. या सगळ्या किंमती कृषीमंत्री म्हणून पवार साहेबांनी वाढवून दिल्या आहेत. मोकळा श्वास घेता यावा म्हणून कर्जमुक्तीची भूमिका स्वीकारली गेली. शेतकऱ्याच्या हिताचे अनेक निर्णय साहेबांनी जाणिवपूर्वक केले म्हणूनच शेतकरी वर्गात प्रचंड समाधान आहे. काही गोष्टींचे दर आता जगात ठरताहेत. ते ठरविणे देशाच्या किंवा राज्याच्या हातात राहिलेले नाही. जागतिक तुटवडा निर्माण झाला की दर वाढतात. जगातील तेल व साखर टंचाईला पवार साहेब जबाबदार आहेत का? याचे उत्तर टीका करणाऱ्यांनी दिले पाहिजे. डाळींचे उत्पादन जगात कमी झाले. अनेक जिल्ह्यात दुष्काळ पडला, पाऊस कमी झाला. पवार साहेबांनी काय पाऊस दडविला होता का? योग्य असेल तिथे जरुर टीका करा. आमचा पक्ष छोटा असला तरी नेता मुळीच छोटा नाही. नेत्याच्या सन्मानापेक्षा आम्ही आमच्या खुर्च्या महत्त्वाच्या मानत नाही. एकत्र सरकारात राहून कुरघोडी करायचा उद्योग जर कोणी करत असेल तर त्याला जशास तशे उत्तर देण्याचा मार्ग स्वीकारला जाईल.

शेतीचा धंदा आज उपेक्षित आहे. त्याला न्याय देण्याचा प्रयत्न आपण करूया. यापुढच्या काळात चुकीच्या पद्धतीने टीका करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवूया. आम्ही निव्वळ जगणे पसंत करणार नाही. आमचा स्वाभिमानही तितकाच महत्त्वाचा आहे.

विजेचा जो प्रश्न राज्याला गेली ५-६ वर्षे भेडसावत होता त्याला मध्यंतरी सरकारने निधी दिल्याने २०१२ साली महाराष्ट्र भारमुक्त होईल. अंधारातून महाराष्ट्राची मुक्तता होईल पण कधीतरी आपणसुद्धा हे प्रश्न का निर्माण झाले? त्यावर काय उपाय केले? हे लोकांपर्यंत नेले पाहिजे. एक प्रशिक्षित कार्यकर्ता १०० कार्यकर्त्यांना भारी पडतो. त्यासाठी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण चालू ठेवले पाहिजे. प्रशिक्षीत कार्यकर्ते हीच पक्षाची खरी संपत्ती आहे. प्रसिद्धी माध्यमांशी संबंध केवळ पैशाने जोडले जातात हे १०० टक्के चूक आहे. चांगले काम करून त्याच्या बातम्या देणे तितकेच आवश्यक आहे. आज लोकांची जागृती वाढत चाललेली आहे. आपल्या चुकीच्या वागण्याने पक्ष बदनाम होण्याची शक्यता आहे. याचे भान कार्यकर्त्यांनी ठेवले पाहिजे. राजकीय आधार मिळाला की चुका मोठ्या होत जातात. महाराष्ट्रातील कुठलाही पक्ष आपल्यावर गुंड किंवा गुन्हेगारीचा आरोप करु शकत नाही. चांगले कार्यकर्ते हे संख्येने राष्ट्रवादीतच अधिक आहेत हा माझा दावा आहे. काही लोक आमच्यावर आरोप करतात की आमची गुन्हेगारांची पार्टी आहे. लोक आमच्याकडे येतांना गुन्हेगार ठरतात आणि त्यांच्याकडे असतांना हिरो होतात. हा प्रकार अजब आहे. आजही महाराष्ट्रातील तरुण मनाचा कानोसा घेतला तर ग्रामीण तरुण राष्ट्रवादीच्याच जवळ आहे. शहरी तरुण संघटीत करायला नवनवीन उपक्रम करण्याची आवश्यकता आहे. आपण धर्मनिरपेक्षतेचा ढाचा कायम ठेवून त्यांच्याबरोबर काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. एकसंघ व एकदिलाने उभे राहिले पाहिजे. पवार साहेब हेच आपल्या सर्वांचे भांडवल आहे. महाराष्ट्राचे ते शक्तीस्थळ असल्याने त्यांच्यावर हल्ले होत आहेत. ते परतवून लावण्यासाठी आपण सारेजण कवच बनूया. त्यांच्यापर्यंत ते हल्ले पोहचण्यापूर्वीच ते परतवून लावूया या दृष्टीने कार्यकर्त्यांनी तयारी करावी अशी माझी त्यांना विनंती.

# महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाच्या नव्या दिशा

**जयंत पाटील** (ग्रामविकास मंत्री)



गेली अनेक वर्षे शहरे आणि ग्रामीण भाग यातील अंतराबाबत बरीच चर्चा यापूर्वी झालेली आहे. ग्रामीण भागातील जीवनशैली, तेथील गरजा, माफक अपेक्षा यांची माहिती आपल्याला आहे. मानवी विकासाचा निर्देशांक काढला तर ग्रामीण भाग शहरांपेक्षा बराच मागे आहे. गडचिरोली, नंदुरबार हे जिल्हे तर ३३ टक्क्यांवर समाधान मानत आहेत. खालून १५ मध्ये जे जिल्हे येतात त्यात यवतमाळ, बुलढाणा व आदिवासी जिल्ह्यांचा नंबर लागतो आहे. मुंबईतील माणसाच्या जीवनाला १०० निर्देशांक देत असू तर त्या आदिवासी जिल्ह्यांचा निर्देशांक ३० टक्क्यांपेक्षाही कमी आहे. शिक्षण, आरोग्य व दरडोई उत्पन्नावर आधारित मानवी निर्देशांक असतो. हा निर्देशांक जिथे कमी आहे तिथे जास्त पैसे देण्याचे धोरण अर्थमंत्री सुनील तटकरे यांनी अवलंबिले आहे त्यामुळे ग्रामीण भागाला न्याय मिळतोय.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी आपण अनेक योजना जाणिवपूर्वक राबवितोय. माणसांनी गाव स्वच्छ करायला हवा म्हणून जे संत गाडगेबाबा अभियान आपण गेली काही वर्षे राबवित आहोत त्याला आता लोकचळवळीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. तंटामुक्त अभियानामुळे अनेक गावांत चांगले वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व योजना राबविताना मूळ दृष्टिकोन हाच आहे की खेडेगावात पैसे गेले पाहिजेत. निर्मलग्राम योजनेला लोकांनी दिलेला प्रतिसाद चांगला असला आणि स्वच्छतेच्या संदर्भात सगळ्या गावांपर्यंत पोहोचण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केलेला असला तरीही अजूनही सगळी गावे निर्मलग्राम झालेली नाहीत. स्वच्छतेच्या आणि निर्मलग्राममुक्तीच्या अभियानात भाग घेणाऱ्या गावांची संख्या मर्यादितच आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आपण या ज्या सगळ्या योजना राबवित आहोत त्यांना जनतेचा प्रतिसाद फार मोठा आहे. गेल्या वर्षी ६७ कोटी रुपये तंटामुक्तीसाठी जी पारितोषिके दिली त्याच्यापोटी ग्रामपंचायतीला दिले आहेत. आता माणसांची भूक वाढली आहे. पर्यावरणात जो असमतोल निर्माण होत आहे त्याबाबतची जागरुकताही लोकांमध्ये वाढीला लावण्याचे काम करावे लागेल. गावाची लोकसंख्या ५००० असेल तर ५००० झाले लावली पाहिजेत आणि ती टिकली पाहिजेत. ही जबाबदारी स्थानिक लोकांनी घेतली पाहिजेत. या झाडांची संख्या जर २५०० झाली तर तेवढेच गुण देऊन गावाची महसुली वसुली १०० टक्के झाली, निर्मलग्राम ७५ टक्के झाले, स्वच्छता अभियानात ६०-६५ टक्के काम झाले आणि सर्व योजनांबाबत गावात जागृती होऊन जर ते गाव निकषांत आले तरच लोकसंख्येच्या प्रमाणात त्याला निधी देण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. आर्थिकदृष्ट्या महाराष्ट्र खंबीर असतांना त्याचा योग्य आर्थिक वाटा ग्रामीण भागाला मिळाला पाहिजे. आज १०७ कोटी रुपये रस्त्यावरील वीजबीलापोटी ग्रामपंचायतीचे आम्ही भरतो आहोत. या सगळ्या गावातील स्ट्रीट लाईट या सौरउर्जेखाली नेण्याचा प्रयत्न करुया. खेडेगावातील गटारे, रस्ते चांगल्या दर्जाची व्हावीत आणि ग्रामपंचायतीचे कार्यालय चांगले उभे रहावे यासाठी ही खेडेगावे आर्थिकदृष्ट्या ताकतीने पुढे नेऊन सर्व सोयी-सुविधा येथे उपलब्ध करुन देण्याचा आणि ग्रामपंचायतीला संगणक देण्याचा प्रयत्न करतो आहोत. यापुढे शिक्षक नाहीत म्हणून शाळा मोकळ्या राहणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण करुया. अनेक गावांत ग्रामसेवकच नाहीत. त्याच्या गावात येण्या-जाण्याची नोंद करून त्यावर पगारपत्रके सुरु करण्यात येतील.

शाळांपासून अशी सुरुवात करुया. शिक्षकांच्या येण्याजाण्याची नोंद केली जाईल. माझ्या गावांत माणसे येतात. तेव्हा ती वेळेत यावीत व वेळेत परत जावीत हा गावातील लोकांनी आग्रह धरला तर तो आपण रास्त आहे असे मानले पाहिजे.

सेल्फ हेल्प ग्रुपचे काम आपण फार वाढवितो आहोत ते अधिक चांगल्या पद्धतीने पुढे नेले पाहिजे. अनेक महिला बचत गटांना आज सहजासहजी कर्ज मिळत नाही. बांगला देशात गेल्यावर माझ्या हे लक्षात आले. तिथल्या ग्रामीण बँकेत २७ हजार लोक काम करतात. ५ जणींचा एक बचत गट असतो. कुठेही लिखापढी नाही. कर्ज देणाऱ्या महिलेकडून एकही कागद लिहून घेत नाहीत. त्या मागतील तेवढे कर्ज त्यांना दिले जाते. लहान कर्ज कधीही डिफॉल्टमध्ये जात नाही. परस्पर विश्वासावर ग्रामीण बँकेचा प्रयत्न यशस्वी झालेला पाहिला. जगातील हे मोठे अपवादात्मक उदाहरण आहे. असा कर्जपुरवठा आपणही महिला बचत गटांना केला पाहिजे. आज कागदपत्रात व लिखापढीत सगळा वेळ जातो आहे.

दारिद्र्य रेषेची जनगणना २००० साली झाली होती. त्याला स्थगिती देण्यात आली. त्यामुळे २००६ सालापर्यंत त्याच लोकसंख्येच्या आधारावर काम चालू राहिले. २००६ साली जी यादी दारिद्र्यरेषेखालील लोकांची तयार झाली होती तिचा अजून वापरच होत नाही. १९९७ च्या यादीवरच आज सगळे काम चालू आहे. केंद्र सरकारने आता दारिद्र्यरेषेखालील लोकांचा नव्याने सर्व्हे करण्याचे ठरविले आहे. त्याबाबतचे बरेच निकष पारदर्शी आहेत. यावर्षीचा सर्व्हे जो पुढच्या तीन-चार महिन्यात होणार आहेत त्याबाबत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी सावध राहणे गरजेचे आहे. आपल्या जवळ व परिसरात राहणाऱ्या लोकांचा या यादीत समावेश होतो की नाही हे कार्यकर्त्यांनी डोळ्यात तेल घालून बघितले पाहिजे. याबाबतचा सर्व्हे जर जबाबदार सरकारी कर्मचाऱ्यांकडून झाला तर ते काम चांगले होऊ शकेल. यंदा दारिद्र्य रेषेखालील लोकांची जी यादी तयार होईल ती पुढची पाच-सात वर्षे वापरली जाणार आहे. तेव्हा दारिद्र्य रेषेचा सर्व्हे हा आपण जिव्हाळ्याचा विषय समजला पाहिजे.

यंदा २५०० कोटी रुपयांचे रस्ते पंतप्रधान सडक योजनेतून हाती घेतले आहेत. पुढच्या वर्षी त्याची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न करतो आहे. १७०० ते १८०० कोटी रुपये आतापर्यंत या पंतप्रधान सडक योजनेवर खर्च झालेले आहे. या योजनेबाबत जागृत राहून कार्यकर्त्यांनी सावधपणे काम केले तर बरेच रस्ते केंद्र सरकारच्या पैशातून पूर्ण करता येतील. बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना योग्य बाजारपेठेत पोहोचविणे हे आपल्यापुढचे मोठे आव्हान आहे. यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्याचा मानस आहे. या बचत गटांचे उत्पादन व्यावसायिक लोकांमार्फत बाजारपेठेत विकले तर जास्तीचे दर मिळू शकतात, असे लक्षात आलेले आहे. यशवंत ग्राम समृद्धी योजना मध्यंतरी बंद झाली होती. त्यात १० टक्के लोकवर्गणीची अट होती. ती आता २५ ते ३० टक्के करून ही योजना पुन्हा चालू करावी अशी लोकांची अपेक्षा व मागणी आहे. मागच्या वेळेला या योजनेत ७०० कोटींपर्यंत रक्कम देण्याची पाळी राज्य सरकारवर आली. आता वर्गणीचे प्रमाण ३० : ७० असे करावे. ३० टक्के लोकवर्गणी घ्यावी आणि योजना पूर्ण कराव्यात. बचत गटाला ४ टक्के व्याज दराने कर्ज देण्याचा आपण निर्णय केला. पण बऱ्याच ठिकाणी अजून या योजनेचा फायदा महिला बचत गटांना मिळतो आहे असे दिसत नाही. ईकोव्हिलेज ही संकल्पना आता वेगाने पुढे येत आहे. या योजनेतून महाराष्ट्राच्या खेड्यात राहणाऱ्या लोकांच्या सर्व मूलभूत व पायाभूत सोयीसुविधांच्या व्यवस्था पूर्ण केल्या जातील. यावर आमचा कटाक्ष आहे.



# भविष्यात स्वबळावर उभे राहावेच लागेल

**छगन भुजबळ**

**उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री**



केंद्र व राज्य सरकारातील आपले मंत्री जनतेच्या विकासासाठी प्रचंड काम करतायेत. हे काम लोकांपर्यंत नेण्यासाठी त्याची सखोल माहिती व ज्ञान कार्यकर्त्यांना असणे जरुरीचे आहे. तसे ते असेल तरच होणाऱ्या आरोपांचा ते प्रतिवाद करून चर्चा करू शकतात. आपल्या नेत्यांवर आणि विशेषतः पवारसाहेबांवर जाणीवपूर्वक टीकेची झोड उठविली जात असताना आपण कार्यकर्त्यांनी गप्प बसता कामा नये. कम्युनिस्ट पक्षाचे किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते जसे आग्रहपूर्वक मत खोडून काढण्याचा प्रयत्न करतात तसेच आपल्याकडेही व्हायला पाहिजे. खासगी चर्चेतही आपण विरोधी पक्षांच्या मतांना खतपाणी घालता कामा नये, ती खोडून टाकली पाहिजेत. राज्यात प्रथम क्रमांकाचा आपला पक्ष असून त्याचे कामही प्रथम क्रमांकाचेच आहे. आपले सगळेच मंत्री विशेष कार्यदक्ष राहून उत्तम काम करतायेत. याबद्दल चिंता बाळगण्याचे काम नाही.

औरंगाबाद, पैठण, बीड, सोलापूर हे सगळे रस्ते चौपदरी करण्यात येणार आहेत. काहींचे काम सुरू झालेले आहे. पावणे चार हजार कोटी रुपये खर्च करून साडेनऊशे किलोमीटरची चार पदरी रस्त्याची कामे मराठवाड्यात सुरू आहे. २३ हजार कोटीं रुपयांची राज्याच्या वतीने व चार-पाच हजार कोटींची कामे केंद्राच्या निधीतून बीओटीवर चालू आहेत. जेजुरी, माहूरगड यासारख्या नवीन तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी टेबलकार जाऊ शकतील अशी नवीन कल्पना घेऊन पुढे जातोय. कामाच्या बाबतीत मंत्री अतिशय उत्कृष्ट काम करतायेत.

कोण कुणाचा कार्यकर्ता आहे ही चर्चा आपण आता थांबविली पाहिजे. प्रत्येक कार्यकर्ता हा शरद पवारांचा आणि राष्ट्रवादीचा आहे असे मानले तर आज जे लहान सहान आवाज होतायेत ते ऐकू येणे बंद होईल. कोणता कार्यकर्ता सांगेल की मी राष्ट्रवादीचा आणि शरद पवारांचा नाही? भावा-बहिणीप्रमाणे एका कुटुंबाने काम करीत राहिलो तर केवळ राष्ट्रवादी पक्षाचीच सत्ता यापुढील काळात सत्तेवर आल्याशिवाय राहणार नाही. आपण कामे खूप करतो पण एकता कमी पडते. निवडणुकीत सगळ्यांना तिकीट देणे शक्य नाही. काहींनी थांबले पाहिजे. पक्षविरोधी कारवाया करणाऱ्यांना कोणतेही महत्त्वाचे स्थान न देता थोडे दिवस थांबविले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत अशा तऱ्हेच्या बंडखोर व पक्षविरोधी वृत्तींना आपण जोपासता कामा नये.

महामंडळाच्या बाबतीत पदाधिकारी नेमताना सर्व प्रमुख नेते एकत्र बसून निर्णय घेतला जाणार आहे. तरुण कार्यकर्त्यांना व विशेषतः ग्रामीण भागातील काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देण्याचे ठरविले आहे. आज आपल्या राज्यात विकासाचे मुख्य प्रश्न सोडवून फालतू विचारांवर चर्चा चालू आहे. टॅक्सी ड्रायव्हरला परवाने देण्यासंबंधीच्या विषयाची चर्चा कुठपर्यंत गेली तर मुंबई कुणाची इथपर्यंत. प्रश्न कुठे येतोय, १९८९ सालचा नियम आहे. परवाना देताना पाहिले पाहिजे की, मराठी भाषेचे ज्ञान याला आहे की नाही. स्थानिक भाषा येत असेल तर व्यवहार उत्तम होतो. आज या प्रश्नावरून

शिवसेना-मनसे हे दोन्ही पक्ष जे काही करतायेत ते मला बिलकुल मंजूर नाही. राष्ट्रवादीचा याला विरोध आहे. कायदा कुणालाही हातात घेता येणार नाही. चेन्नई, कोलकत्ता, बेंगलोर कुणाचे? हा प्रश्न कधीच चर्चेला येत नाही मग मुंबई कुणाची? हा प्रश्न कशाला वारंवार चर्चेला जातो. मुंबईवर प्रत्येक भारतीयाचाच अधिकार आहे. भाषावार प्रांतरचना आपण स्वीकारली आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण होत असताना द्विपक्षीय मुंबई कुणाची यावरून आंदोलन झाले. १०५ लोकांचे त्यात बळी गेले. आता निराळेच प्रश्न उपस्थित करून राजकारण पेटविले जात आहे. आता शिवसेनेला कळलं असेल कुणाची किती ताकद आहे. राहूल गांधी येऊन कार्यक्रम करून गेले. सेनेवाले नुसते डरकाळ्या फोडत राहिले. हात दाखवून अवलक्षण करू नका. पक्षाची झाकली मूठ तशीच ठेवा. महाराष्ट्रातील सर्व जाती धर्माच्या लोकांना संरक्षण देण्याचे काम महाराष्ट्र सरकारने केले आहे. एकदेखील परप्रांतीय महाराष्ट्र सोडून गेलेला नाही. बाहेरच्या राज्यात खोटी हवा पसरवली जात आहे.

एखाद्या वेळेला पक्ष जेव्हा वरचढ होत जातो तेव्हा त्या पक्षाच्या नेत्याला नामोहरम करण्याकरिता लक्ष केले जाते. इंदिरा गांधींना देखील असेच लक्ष केले होते. त्यांच्यावर टीका व बदनामीची झोड उठविली होती. आज सगळ्यांना सारे काही समजते. पण तरीदेखील जाणीवपूर्वक महागाईच्या प्रश्नांवरून पवारांना लक्ष केले जातेय. महागाई खूप झाली असे सांगितले जातेय. गेल्या ६० वर्षांत देशात अनेक कृषीमंत्री झाले. त्या कृषीमंत्र्यांपैकी एकालाही आपण कधी महागाईच्या प्रश्नांवरून जबाबदार धरून टारगेट केलेले नाही. त्यावेळेला महागाईबद्दल सरकारलाच जबाबदार धरले जायचे. आता या वेळेला पवारसाहेबांना लक्ष करण्यापाठिमागे एक राजकारण व षडयंत्र आहे. प्रत्येकाचा त्यामागे काहीतरी हेतू आहे. म्हणून ही टीका चालू आहे. चीनमध्ये महागाई ४४० टक्के झाली. भारतात महागाईत ५० टक्केच वाढ झाली. भारतात साखर २० वर्षांत ८५ टक्क्यांनी वाढली. चीनमध्ये ४३५ टक्क्यांनी साखरेचे दर वाढले. हा सगळा ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम आहे. अन्नधान्याच्या शेतीवर विपरित परिणाम झालेला आहे. उत्पादन घटले आहे. मागणी कायम आहे. पुरवठा कमी आहे. त्यामुळे भाववाढ अटळ आहे. ही महागाई कमी करण्यासाठी काही बोजा राज्यसरकार उचलते आहे. यावर्षी १२५ कोटी रुपयांचा बोजा आत्तापर्यंत उचलला आहे. टीका करणाऱ्यांच्या मनात केवळ महागाईचा विषय नाही. दुसरे काहीतरी दडलेले आहे. प्रसिद्धी माध्यमांनी महागाईच्या प्रश्नावरून आमच्या नेत्याला लक्ष न बनविता खरी व वस्तुस्थितीची चर्चा घडवून आणावी.

शिवसेना, भाजप यांची राज्यातील ताकद कमी होत चालली आहे. कदाचित ती आणखीन कमी होईल. महाराष्ट्राचे राजकारण त्याप्रमाणात बदलत जाईल. राष्ट्रवादीला भविष्यात प्रखरपणे स्वबळावर उभे राहावे लागेल. आज महाराष्ट्रातील मित्रपक्षातील काही लोकही आमच्यावर टीका करून लक्ष्य बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण आपण स्वतःचे बळ पूर्णपणे वापरून प्रखरपणे उभे राहावे लागेल. वेळ आली तर स्वतंत्रपणे आखाड्यात जावे लागेल. त्याचे काम आजपासून सुरू झाले पाहिजे. जिल्हा परिषद, महापालिकांच्या निवडणुकीत आपण मतभेद गाडून कामाला लागलो तर या सर्व संस्था ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही. लहानसहान टीका टिपण्णीवरून विचलित होण्याची गरज नाही. आपला आलेख नेहमी वाढत जाईल व शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पक्षाची ताकद दुप्पटीने वाढल्याशिवाय राहणार नाही. हा निर्धार येथून जाताना आपण सर्वांनी केला पाहिजे. अवघड असे काहीही नाही. हे सहज शक्य आहे. त्यासाठी आपली इच्छाशक्ती व कार्य करण्याची तयारी बुलंद असली पाहिजे.



*प्रदेशाध्यक्ष मधुकर पिचड हे पुष्पगुच्छ देऊन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचे स्वागत करताना.*

# रस्त्यावर उतरून संघर्षाची तयारी ठेवा

## जितेंद्र आव्हाड (आमदार)



रस्त्यावर उतरून खरा संघर्ष करणाऱ्यांना विचार सांगण्याची गरज आहे. महाराष्ट्राचे राजकारण जसजसे नागरी होत जाईल तस तसे ते कॉस्मोपॉलिटन होत जाईल. कार्यकर्ते व नेत्यांची विचारधारा परिपक्व व साफ असली पाहिजे. तोटा झाला तरी चालेल पण स्वीकारलेली राजकीय विचारधारा सोडणार नाही या निर्धाराने कार्यकर्ता उभा राहिला पाहिजे आणि नेतृत्वाने त्याला लढण्यासाठी हिंमत दिली पाहिजे. किती दिवस त्यांची स्पंदने होऊ द्यायची. मनसेकडे आपण त्याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. मनसे दिवसेंदिवस आक्रमक होत जाईल. त्याला वैचारिक उत्तर आपल्या कार्यकर्त्यांनी दिले पाहिजे.

विचारांची लढाई ही परिपक्वतेने लढता आली पाहिजे. तुमचा माझा आवाज हा क्षीण वा दाबून जमणार नाही. कार्यकर्त्यांनी आक्रमक होऊन रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. पवार साहेबांवर हल्ले होत असताना आपण कार्यकर्त्यांनी छातीचा कोट करून एकजुटीने उभे राहून आक्रमकपणे पण अभ्यासूरितीने हे हल्ले परतवून लावले पाहिजेत. मिश्रा आयोगाने सुचविल्याप्रमाणे १० टक्के आरक्षण मुसलमानांना दिलेच पाहिजे याविषयी दुमत नाही. पण कुणाचेही आरक्षण त्यामुळे कमी होता कामा नये याची जबाबदारी व भान ठेवावेच लागेल. विचारांची लढाई ही विचारांनीच लढली पाहिजे. येणारा काळ सोपा नाही. आपल्या कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची सवयच राहिलेली नाही. कुठेतरी ठामपणे उभे राहिलो तरच तिढा सुटेल.

# अल्पसंख्याकांच्या आरक्षणाचे धोरण ठरवा

## हबीब फकी (अध्यक्ष, अल्पसंख्यांक सेल)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी पहिल्यांदा मुस्लिम महिलेला मंत्रिमंडळात घेऊन क्रांतिकारी कार्य केले आहे. पक्षाचा प्रभावीपणे प्रचार व्हायचा असेल तर आमदारांचा आणि मंत्र्यांचा निधी खर्च करण्याचा अधिकार पक्षाच्या जिल्हा व तालुका अध्यक्षांना दिला पाहिजे. मौलाना आझाद महामंडळाचा निधी आज वाटला जात असला तरी त्याचे श्रेय आपल्या पक्षाला मिळत नाही. अल्पसंख्यांक आयोगाला जिल्हा दिवाणी न्यायाधिशाचा दर्जा देण्याची गरज असून रंगनाथ मिश्रा आयोगाचा अल्पसंख्यांकांना सवलती देण्यासंबंधीचा अहवाल लोकसभेत ठेवला गेला आहे. मात्र त्याबाबत आपल्या पक्षाचे धोरण अजून ठरलेले नाही. ते लवकर ठरवावे व अल्पसंख्यांकांना त्वरित आरक्षणात वाटा मिळावा.

# दलितांना निवडणूक समितीत स्थान हवे


## प्रा. लक्ष्मणराव ढोबळे

**(पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री)**




देशाचे सामाजिक धोरण १९३२ साली पहिल्यांदा आखण्यात आले. गरजेप्रमाणे त्यात बदल होत गेले. पण गरजू कार्यकर्त्यांना योजनांचे अभ्यास नसल्यामुळे ती माणसे ५० वर्षे मागे गेली. समान संधी, समान प्रतिष्ठा मिळविण्यासाठी आपण काय करू शकतो याचा प्रत्येकाने विचार करून आपली क्षमता व कुवत तपासली पाहिजे. नक्षलवादाला गरीब समाज कसा बळी पडतो, योजनांचा फायदा मिळविताना खरी गरजू व गरीब माणसे कशी वंचित राहतात याची शेकडो उदाहरणे सांगता येतील. दलित समाजाचा उद्धार करायला अनेक महामंडळे आहेत. पण या महामंडळांकडे शासनाने सख्ख्या आईच्या भूमिकेतून पाहण्याची गरज आहे. लोकशाहीचे परिमाण म्हणून समान संधी देण्याचा विचार पुढे येतो तेव्हा सर्वांचेच जीवन सुधारले पाहिजे ही त्या मागील उदात्त कल्पना असली पाहिजे. एकाच घरातले चार-पाच लोक आय.ए.एस.मध्ये येणार असतील आणि सगळ्या सवलतींचा फायदा आयुष्यभर त्यांनाच मिळणार असेल तर त्याला संधीची समानता मानायचे कसे?



दलितांसाठी घेतलेले निर्णयही अनेकदा प्रसिद्ध होत नाहीत. दारिद्र्य निर्मूलन कक्ष तालुक्याच्या पातळीवर निर्माण केला पण त्याची बैठकच होत नाही. २०१२ मध्ये होणारी जिल्हा परिषदेची निवडणूक जिंकून सत्ता आपल्याला ताब्यात घ्यायची आहे. १५ महानगरपालिकांच्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आपल्याला जिंकायच्या असतील तर तालुका अध्यक्षांनी मागास, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक व भटक्या विमुक्त लोकांनाही निवडणूक कमिटीत घेतले पाहिजे. त्या समाजाच्या काही लोकांना उमेदवारी दिली पाहिजे.

झोपडीमुक्त दलित समाजाची निर्मिती आपल्याला करायची आहे. बौद्ध समाजाचे पाच खासदार निवडून आले असून एक खासदार कमी झाला आहे. दलित, महिला, मुस्लिम यांच्या कल्याणाची चर्चा होते. पण त्यांच्या योजनांची अंमलबजावणी होत नाही ही मोठी शोकांतिका आहे. २००८ सालची कर्जाची थकबाकी माफ करावी अशी दलितांची मागणी होती. पण त्या मागणीला अद्याप यश आलेले नाही. नागरी क्षेत्र वाढते आहे. तिथे दारिद्र्य निर्मूलनासाठी कसोशीने काम उभे करावे लागेल. लोकसंपर्काची मुळे रुजविली तरच आमदारकीचे हिरवेपण टिकविता येते याचे भान कार्यकर्त्यांची ठेवले पाहिजे.

# युवा धोरणाची पुनर्रचना झाली पाहिजे

**सुप्रिया सुळे** (खासदार)



कुठल्याही राज्याचे युवक हे महत्त्वाचे नागरिक असतात म्हणूनच, राज्याच्या विकासामध्ये युवकांचं योगदान असलं पाहिजे. समुदायाचे मौलिक सदस्य असल्यामुळे युवकांना केवळ, निर्णयक्षमता, कौशल्य विकास आणि नेतृत्व गुण विकसित करण्यास प्रोत्साहन देऊन कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये सहभागी होऊन चालणार नाही. तर अर्थपूर्ण सहभागाच्या संधीद्वारे योगदानासाठी प्रोत्साहन द्यावे. नागरिकत्व उपक्रमांद्वारे युवकांमध्ये स्वयंसेवी वृत्तीला चालना द्यावी, लोकशाही मूल्यांचा स्वीकार करण्याची त्यांची समज आणि जाणीव विकसित करावी. युवकांचा सहभाग आणि युवक नेतृत्वाच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावर लोकशाही प्रक्रिया अंमलात आणण्यासाठी प्रोत्साहन व सहकार्य द्यावे. तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर युवा परिषद स्थापन करून सरकारने या परिषदांना सहकार्य करावे. अंमलबजावणीत युवकांचा सहभाग वाढवणे हा युवा परिषद स्थापनेमागचा हेतू आहे. प्रभाग आणि गाव पातळीवर हाती घेण्यात आलेल्या सार्वजनिक कामांच्या गुणवत्ता नियंत्रणात स्थानिक रहिवाशी युवकांना जाणीवपूर्वक सहभागी करून घ्यावे. खेळांचे मैदाने, सार्वजनिक उद्याने, सामुदायिक जागा, टाकाऊ पदार्थांचे व्यवस्थापन आणि विजेच्या तारा, पाणीपुरवठ्याच्या जलवाहिन्या, मलनिःसारण व्यवस्था, नाल्यांची देखभाल आदी पायाभूत सार्वजनिक उपयोगाच्या बाबींच्या व्यवस्थापनात युवकांची निश्चित स्वरुपाची सक्रिय भूमिका असली पाहिजे. आपत्ती व्यवस्थापनात युवकांना सहभागी करून घ्यावे. त्यासाठी त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. प्रयोगाधिष्ठित अभ्यासात, सामाजिक कृती कार्यक्रम संशोधन यात सक्रिय सहभागी असणाऱ्या युवकांना शिष्यवृत्ती/फेलोशिप देण्यात यावी. युवा विकास कार्यक्रमांसाठी युवा अर्थसंकल्प सादर करावा. युवकांच्या समस्यांसाठीच्या निवारणासाठी युवक आयोगाची स्थापना आणि त्याप्रमाणे कृती करावी. युवकांना त्यांच्या योग्यतेनुसार सर्वकाही मिळावं यासाठी धोरण आखणाऱ्यांनी खूपच प्रयत्न केले पाहिजेत हे आपण ओळखलं पाहिजे. त्याचवेळी, अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या बदलांप्रमाणे धोरणांची सुद्धा पुनर्रचना झाली पाहिजे.



# प्रादेशिक वादाने मानसिक दुभंगलेपण


## डी. पी. त्रिपाठी

**राष्ट्रीय महासचिव आणि मुख्य प्रवक्ता**




भारतीय समाज हा सळसळणारा आणि सुसंस्कृत समाज आहे. तेथे मानवी हक्क आणि पर्यावरण यांचे उत्साहाने रक्षण केले जाते. मात्र स्वतःची तुंबडी भरण्यासाठी लोकप्रियतेच्या सवंग, उथळ घोषणा करणाऱ्या तत्त्वांच्या आहारी तो जाणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. दुर्दैवाने अतिशय धोकेबाज शेजारी आपल्या देशाच्या नशिबी आले आहेत. देशाच्या सीमेच्या पलीकडून होणाऱ्या अतिक्रमणामुळे साधनसंपत्ती आणि नागरी सुविधा यावर मोठा ताण पडतो. आधीच देशात भाषिक, वांशिक किंवा जातीमुळे सामाजिक विभाजन आहे. त्याचा उपयोग परिस्थिती अधिक बिघडवण्यासाठी केला जाऊ शकतो. प्रादेशिक वादात वाढ झाल्याने वेगवेगळ्या प्रदेशातील परिस्थिती बदलत चालल्याचे दिसते. भारताची काही राज्ये जगाचा संपूर्ण विचार करण्याऐवजी त्यातील फक्त एखाद्या भागावरच त्यांचे लक्ष केंद्रीत करतात असेही दिसून येते. याची काही उदाहरणे म्हणजे तामिळनाडू आणि श्रीलंका, केरळ आणि युनायटेड अरब अमिराती, प. बंगाल आणि बांगला देश, जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि पाकिस्तान, सिक्किम आणि नेपाळ राष्ट्रीय हितसंबंधाचा खंडित विचार करणारे मानसिक दुभंगलेपण अशा उदाहरणातून दिसून येते.

सुदैवाने महाराष्ट्र राज्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टी ठेवली असून तेथे खुल्या दिलाचे, सर्वांना सामावून घेणारे व बहुढंगी वातावरण आहे. जागतिक आर्थिक स्थितीची घसरण होत असताना सुद्धा महाराष्ट्राने 'गुंतवणुकीसाठी सर्वांच्या पसंतीचे स्थान' हा आपला लौकिक कायम ठेवला आहे. गेल्या वर्षी ५३ टक्के सरळ परदेशी गुंतवणूक आपल्याकडे आकर्षित करण्यात महाराष्ट्र राज यशस्वी ठरले. सर्वसमावेशक आणि सर्वांगीण विकासाची ग्वाही फक्त महाराष्ट्रानेच दिली.

आर्थिक उदारीकरणामुळे समाजातील फूट अधिक तीव्र झाल्याचे दिसते. विरोध आता उघड झाला आहे. सॅटेलाईट टीव्हीमुळे आता प्रेक्षकांना घटना प्रत्यक्ष पाहता येतात. अतिरेक्यांचा हल्ला, गर्दीची झुंडशाही, राजकारण्यांचे स्टींग ऑपरेशनद्वारे होणारे वस्त्रहरण अशा घटना लोक पाहतात. आता सरकारची उदासीनता किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे उद्ध्वस्त झालेले लोकजीवन झाकून ठेवणे अशक्य आहे.

# पवारांवरील टीकेला चोख उत्तर द्या


## तारीक अन्वर

**राष्ट्रीय सरचिटणीस व खासदार**




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना होऊन आता दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. श्री. शरद पवार यांच्यासारखे प्रतिभासंपन्न व प्रभावशाली नेतृत्व आपल्या पक्षाला लाभल्यामुळे समाजातील निरनिराळ्या घटकांतील लोक मोठ्या संख्येने

पक्षाकडे आकर्षित झाले आहेत. राष्ट्रवाद, सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षता या तात्त्विक अधिष्ठानावर पक्ष उभा राहिल्यानं त्याची मोठी वाढ झाली आहे. अर्थात् पक्ष अजून खूप मोठा व बलवान करायचा आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांना सातत्याने प्रशिक्षण देऊन सक्षम करावे लागेल. मागील दहा वर्षांत पक्षाला जेवढे यश मिळाले, त्यावर समाधान मानता येणार नाही. हे यश अपेक्षे इतके मोठे नाही. आपल्या पक्षाने गेल्या दहा वर्षांत प्रचंड काम केले आहे. परंतु लोकांपर्यंत ते नेण्यात आपण कमी पडलेलो आहोत. त्यामुळे देशभरातील सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची शिकस्त करावी लागणार आहे.

कृषी क्षेत्रांत श्री. शरद पवार यांनी कृषी मंत्री म्हणून प्रचंड काम केलेले आहे. त्याचा प्रसार व प्रचार शेवटच्या घटकांपर्यंत नेण्यात आपण कमी पडलेलो आहोत. साहेबांनी किंवा केंद्रातील मंत्र्यांनी केलेले चांगले काम आपण प्रभावीपणे व जागरूकतेने लोकांसमोर नेले पाहिजे. त्यादृष्टीने कार्यकर्त्यांची वैचारिक बैठक तयार केली पाहिजे. पवार साहेबांना विरोधकांकडून जाणीवपूर्वक बदनाम केले जात आहे. त्यांच्यावर खोटी टीका केली जात आहे. या टीकेला राष्ट्रवादीच्या नेते, मंत्री व कार्यकर्त्यांनी चोख उत्तर दिले पाहिजे.

# डावे राजकारणातला समतोल बिघडवितात

## सुनील तटकरे

**(अर्थ व नियोजन मंत्री)**



पक्षाचा विस्तार करून तो अधिक मजबूत करायचा असेल, तर सामुदायिक जबाबदारी घेऊन अधिक काम करण्याची मानसिकता कार्यकर्त्यांनी दाखवावी लागेल. आज महागाईचे सगळे खापर श्री. शरद पवार यांच्यावर फोडले जात आहे. परंतु महागाईच्या प्रश्नाला ते काही एकटे जबाबदार नाहीत. संपूर्ण मंत्रिमंडळाचे धोरण व निर्णय त्यासाठी जबाबदार आहेत. कमी झालेल्या महागाईचे श्रेय घेण्यासाठी दुसरे लोक टपलेले असून, त्यांना आपण उघडपणे सांगितलं पाहिजे, की टीकेला आम्ही आणि यशाला तुम्ही, हे धोरण यापुढील काळात सहन केले जाणार नाही. राज्यात आघाडीचं सरकार सत्तेवर येत असताना व लोकांना कौल मागताना आघाडीच्या वचननाम्यात जी आश्वासने दिलेली आहेत ती पूर्ण केली जातील. राज्यातील अविकसित व मागासलेल्या जिल्ह्यांना विकासाची अधिक संधी कशी मिळेल, यावर लक्ष ठेवून तसे कार्यक्रम तिथे राबविले जातील. भंडारा जिल्ह्याला अधिक ताकद देण्याची भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे. जिल्हानिहाय तरतूदींचं वाटप करताना आदिवासी, दलित, मागासवर्गीय, आणि अल्पसंख्यांक, भटके विमुक्त यांचा प्राधान्याने विचार केला जाईल. स्वत:ला डावे म्हणविणारे काही पक्ष शिवसेना, भाजपसारख्या जातीयवादी शक्तींची मदत घेऊन कळत-नकळत का होईना, पण जिल्ह्यात राजकीय व सामाजिक समतोल बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. डावे पक्ष शिल्लक असले, तरी डाव्या विचारांचं राजकारण आज राहिलेलं नाही, त्यामुळे या डाव्या पक्षांशी युती करताना राष्ट्रवादीने थोडं साधवच राहिलं पाहिजे. राज्यातील महागाई कमी करण्यासाठी राज्य सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असून, आत्तापर्यंत सव्वाशे ते दीडशे कोटी रुपये गोरगरीब, दारिद्र्य रेषेखालील लोक व गरजू व्यक्तींना धान्य वाटण्याकरिता खर्च केलेले आहेत. महागाईची झळ सर्वसामान्यांना पोहोचू नये, याबाबतची दक्षता राज्य सरकार घेणार असून, त्यासाठी लागेल, तेवढा निधी उपलब्ध करून दिला जाईल.

# दरवाढीशिवाय शेतकऱ्यांना न्याय कसा मिळणार?

**अरूण गुजराथी**
**(आमदार व माजी प्रदेशाध्यक्ष)**




महागाई हा कुठल्याही भाषेतला कडू, अप्रिय व न आवडणारा शब्द आहे. सगळ्यांनाच त्याबाबत तिटकारा आहे. प्रत्येक वर्षी या महागाईबाबत सभागृहात व सभागृहाच्या बाहेरही चर्चा होताना दिसते. महागाईही सातत्याची प्रक्रिया आहे. ती निरंतर चालणारी आहे. दरवर्षी आणि यावर्षी होणारी भाववाढ यात फार अंतर आहे. देशाचा विकास-वृद्धी हा महत्त्वाचा भाग आहे. नैसर्गिक आपत्ती वा अन्य कारणांमुळे आणि विशेषत: वाढत्या लोकसंख्येमुळे आपल्या सारख्या विकसनशील देशात महागाई हा सातत्याने निर्माण होणारा प्रश्न आहे. कारण या देशातील ६६ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. आणि शेती करणं हा देशातील सर्वात मोठा जुगार आहे. कारण ही सगळी शेती पावसावर व निसर्गाच्या लहरींवर अवलंबून आहे. त्यामुळे निसर्गाची मदत असेल, तर उत्पादन चांगलं होणार अन्यथा ते घटणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेल्या मालाचा योग्य व रास्त दर दिल्याशिवाय त्यांना शेती करणे परवडणार नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता आधारभूत किंमतीत वाढ करावीच लागेल आणि ही वाढ केल्यानंतर महागाई वाढणार हे उघड सत्य आहे. ते आपण सर्वांनी स्वीकारले पाहिजे. पवारसाहेबांना या महागाईच्या प्रश्नावरून दोषी धरण्याचं काहीही कारण नाही. त्यांच्यावरील टीकेला आपण कार्यकर्त्यांनी सडेतोड भाषेत उत्तर दिले पाहिजे.

# न्या. मिश्रा अहवालाची अंमलबजावणी करा

**नबाब मलिक** (आमदार)



देशातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी केंद्र सरकारने न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अहवाल देऊन आता बरेच दिवस झाले आहे. केंद्र सरकारने हा अहवाल स्वीकारलेला असला तरीही त्याची अंमलबजावणी मात्र अद्याप सुरू झालेली नाही. या अहवालाने अल्पसंख्यांक समाजाला नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण द्यावे असे नमूद केलेले आहे. इतर मागासवर्गीय लोकांचे व मागासवर्गीयांचे आरक्षणाचे प्रमाण कमी करून त्या जागा अल्पसंख्याकांना मिळाव्यात अशी आमची मागणी नाही. ओबीसी व दलित यांचे आरक्षणाचे प्रमाण कायम ठेवून आमच्या न्याय मागण्यांचा विचार झाला पाहिजे. पक्षाने विद्यार्थी व युवकांवर जास्त लक्ष केंद्रित करून त्यांचे स्वतंत्र शिबीर घ्यावे व वैचारिकदृष्ट्या कार्यकर्ता तयार करावा.

## यावेळी झालेली इतरांची भाषणे थोडक्यात पुढीलप्रमाणे :

### भास्कर जाधव, (राज्यमंत्री) :



धर्म, जात, भाषा, परप्रांतीय यासारखे विषय उपस्थित करून समाजात ताणतणाव निर्माण करणारे पक्ष व लोक म्हणजे एक प्रकारची रिकामी पण सुडाने भरलेली डोकी आहेत. त्यांच्याशी आपल्याला विचारानेच लढावे लागेल. या लोकांना भडकावण्याकरिता फार वेळ लागत नाही. पक्ष वाढविण्याकरिता पैसे फारसे लागत नाही. आपण कार्यकर्त्यांनी रोज एक तास पक्षाला देऊन पक्षाबद्दल चार चांगले विचार लोकांमध्ये पसरविले तर पक्ष मजबूत होऊ शकतो. पक्षाने आम्हाला काय दिले यापेक्षा आम्ही पक्षाला काय देतो हे जास्त महत्त्वाचे आहे.

### शंकर अण्णा धोंडगे, (आमदार) :

अनेक गोष्टींत जागतिक बाजाराचा आता परिणाम होणार आहे. शेती हा विषय व्यवसाय शिक्षणात आणला पाहिजे अशी अनेकांची मागणी आहे. आता बाजारातील शेतीमालाचे दर हे विकेल ते पिकेल या तत्त्वानुसार ठरणार आहे. खतांवरती दरवर्षी आपण एक लाख वीस हजार कोटींची सबसिडी देतो. ती शेतकऱ्यांना न मिळता उत्पादकांना मिळते. यापुढील काळात धोरणात बदल करून थेट शेतकऱ्यांना सबसिडी द्यावी. सूक्ष्म सिंचनाचा कार्यक्रम वेगाने पुढे नेण्यासाठी सरकारने १०० टक्के अनुदान द्यावे. शेतीसाठी बिनव्याजी कर्ज मिळणे आवश्यक असून, अटलबिहारी पंतप्रधान असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्येला सुरुवात झाली. भाववाढ ही वस्तुस्थिती आहे. तिला कोणीही रोखू शकत नाही. शेतीमालाचे भाव नियंत्रित करणे याचा दुसरा अर्थ भाव पाडणे असाच आहे. त्यातून शेतकऱ्यांचे नुकसानच होईल.



### रामभाऊ पंडागळे, (आमदार) :



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी काळात आपल्याला जिंकायच्या असतील तर दलित व मागासवर्गीय कार्यकर्त्यांना निवडणूक प्रक्रियेमध्ये मानाचे स्थान देऊन प्राधान्याने उमेदवाऱ्या दिल्या पाहिजेत. दलित समाज हा सुरुवातीपासूनच आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या व पवारसाहेबांच्या पाठिशी उभा राहिला असून या समाजाला निर्णय प्रक्रियेत मोठ्या संख्येने सामावून घेण्याची गरज आहे. आज शरद पवारांच्यावर महागाईच्या प्रश्नांवरून जी टीका होते आहे तिला उत्तर देण्यासाठी आपण कार्यकर्त्यांना संघटित करून त्यांचे प्रबोधन केले पाहिजे.

### निवेदिता माने, (राष्ट्रीय महिला अध्यक्ष) :



पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये निवडणुका संपल्यानंतर मरगळ आलेली दिसते आहे. ती संपुष्टात आणण्यासाठी आणि स्पिरीट निर्माण करण्याकरिता पक्षाने व्यापक कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. राजकारणात स्त्रियांना महत्त्व देऊन पुढे नेण्याची गरज असून, त्यासाठी महिला आरक्षण प्राधान्याने स्वीकारले गेले पाहिजे. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी १९०२ मध्ये महिलांच्याकरिता आरक्षण जाहीर केले होते. त्यांचा त्यावेळी दृष्टिकोन किती उदात्त होता हे लक्षात घेऊन आपण आपल्या पक्षात महिलांना मानाचे स्थान व महत्त्वाची पदे दिली पाहिजेत.

शिबिरात रामराजे नाईक-निंबाळकर, प्रा. फौजिया खान, सौ. वंदना चव्हाण, नरेंद्र वर्मा, निरंजन डावखरे व इतरांची भाषणे झाली. मुनाफ हकीम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.